cmyk

## संपादकीय

### महायुतीत टोकाची नाराजी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर अनेक राजकीय पक्ष आपली ताकद वाढवण्याच्या प्रयत्नात आहेत. आपल्या पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना बळ देण्याच्या प्रयत्नात आपण काय करतो आहोत याचे भानच त्यांना राहिले नाही. यातूनच संघर्षाचे, फोडाफोडीचे राजकारण सुरु झाले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२०४ | शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# कीटकनाशकांमुळे शेतकऱ्यांना नैराश्य आणि विस्मरणाचा धोका

## आयसीएमआर ने केलेल्या अभ्यासातून गंभीर वास्तव आले समोर

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

कीटकनाशके पिकांचे रोग आणि कीटकांपासून संरक्षण करत असल्याने शेतकऱ्याला चांगले उत्पादन मिळते. यामुळेच याचा नियमित वापरही होतो, पण अयोग्य वापरामुळे पर्यावरणाबरोबर मानवी आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो हे यापूर्वीच्या अनेक संशोधनात स्पष्ट झाले आहे. मात्र आता देशातील ग्रामीण लोकसंख्येच्या, विशेषतः शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर



कीटकनाशकांचा गंभीर परिणाम होतो आहे, असे इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) ने केलेल्या अभ्यासातून दिसून आले आहे.

पश्चिम बंगालमधील कृषी क्षेत्रांमध्ये इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) ने कीटकनाशके फवारणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर ▶▶ पान २ वर

### महिलांपेक्षा पुरुषांमध्ये धोका अधिक

संशोधकांनी असे नोंदवले की, ३० वर्षांहून अधिक काळ शेती करणाऱ्या आणि दीर्घकाळ कीटकनाशकांच्या संपर्कात असलेल्या शेतकऱ्यांना १.८ पट धोका वाढतो. हा धोका महिलांपेक्षा पुरुषांमध्ये जवळजवळ दुप्पट होता. अभ्यासात असेही दिसून आले आहे की शेतमजूर जे संपूर्ण दिवस शेतात घालवतात त्यांना केवळ स्मरणशक्ती कमी होतेच असे नाही तर दैनंदिन कामे करण्यातही अडचणी येतात. अनेक प्रकरणांमध्ये, हालचालींच्या विकारांची सुरुवातीची लक्षणे देखील आढळून आली.

### फवारणी करताना अशी घ्या काळजी

या संशोधतून समोर आलेल्या धक्कादायक प्रकारानंतर यातील संशोधकांनी म्हटल आहे की, शेतकऱ्यांनी कीटकनाशक फवारणी करताना सुरक्षा किट, मास्क, हातमोजे आणि सामाजिक अंतर राखावे. याशिवाय यासारख्या प्रोटोकॉलबद्दल शेतकऱ्यांना शिक्षित करणे आवश्यक असल्याचेही संशाधकांनी म्हटले आहे.

### संशोधनातून गंभीर बाब समोर

इंडियन काउन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या डॉक्टरांनी शेतकऱ्यांच्या रक्ताचे नमुने तपासले. या तपासणीत, रक्तातील तीन महत्त्वाच्या गोष्टी (ज्यांना बायोमार्कर म्हणतात) शोधल्या. यामध्ये असे आढळले की, जे शेतकरी दिवसातून ८ तासांपेक्षा जास्त वेळ शेतीमध्ये काम करतात. तसेच आठवड्यातून किमान एकदा कीटकनाशके वापरतात, त्यांच्यात पॅरॉक्सोनेस पातळी मोठ्या प्रमाणावर वाढलेली आढळली. यातून हे स्पष्ट होते की, शरीर या रासायनिक विषावर तीव्र प्रतिक्रिया देत आहे आणि ते शरीराला हानी पोहोचवत आहे.

## थोडक्यात...

### नितीश कुमारांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

पाटणाः नितीश कुमार यांनी गुरूवारी (दि. २०) दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पाटणा येथील ऐतिहासिक गांधी मैदानात राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी त्यांना पदाची शपथ दिली. यानंतर सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. ते दुसऱ्यांदा बिहारचे उपमुख्यमंत्री झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह भाजप आणि एनडीएच्या अनेक वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी २४ अन्य मंत्र्यांना शपथ दिली. बिहार विधानसभा निवडणुकीत रालोआने २४३ पैकी २०७ जागांवर विजय मिळवला.

### भाषिक वादाचा ताण विद्यार्थ्याने केली आत्महत्या

डोंबिवलीः मराठी बोलता येत नाही का ? मराठीत बोलायची लाज वाटते का ? अशा प्रश्नांची सरबत्ती करत लोकलमधील चार–पाच जणांच्या टोळक्याने केलेल्या मारझोडीमुळे कल्याणमध्ये राहणारा १९ वर्षीय कॉलेजचा विद्यार्थी तणावाखाली आला. घरी परतल्यानंतर या तरूणाने बेडरूमचे दार आतून बंद केले आणि सिलिंग फॅनला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन जिवनत्याग केला. या घटनेनंतर सदर तरूण राहत असलेल्या कल्याण पूर्वेतील तिसगांव नाक्यावर असलेल्या सहजिवन वसाहतीवर शोककळा पसरली आहे. अर्णव जितेंद्र खैरे (१९) असे या तरूणाचे नाव असून तो मुलुंडच्या केळकर कॉलेजमध्ये प्रथम वर्षात विज्ञान शाखेचा विद्यार्थी होता.

### स्फोट प्रकरणी आणखी चार आरोपींना अटक

दिल्लीः दिल्लीत १० नोव्हेंबर रोजी लाल किल्ल्याबाहेर झालेल्या स्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) आणखी चार प्रमुख आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात अटक झालेल्यांची एकूण संख्या सहा झाली आहे. पटियाला हाऊस कोर्टाच्या जिल्हा सत्र न्यायाधीशांच्या प्रोडक्शन ऑर्डरवर एनआयएने जम्मू आणि काश्मीरमधून चारही आरोपींना ताब्यात घेतले. चौघांनाही १० दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. जम्मू– काश्मीरच्या पुलवामा येथील रहिवासी डॉ. मुजम्मिल शकील गनई, अनंतनाग येथील रहिवासी डॉ. आदिल अहमद राथेर, लखनऊ येथील रहिवासी डॉ. शाहीन सईद आणि शोपियां येथील रहिवासी मुफ्ती इरफान अहमद वागे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या सर्वांनी दहशतवादी हल्ल्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती, असे एनआयएच्या तपासात स्पष्ट झाले आहे. एनआयएने आधीच दोन इतर आरोपींना अटक केली आहे.

### अनिल अंबानींची १४०० कोटींची मालमत्ता जप्त

मुंबईः अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) उद्योगपतीअनिल अंबानी आणि त्यांच्या कंपन्यांची १,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची नवीन मालमत्ता जप्त केली आहे. मनी लाँड्रिंग चौकशी प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. यामुळे या प्रकरणात जप्त केलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य सुमारे ९,००० कोटी रुपयांवर पोहोचले असल्याचे वृत्त एएनआयने दिले आहे. रिलायन्स होम फायनान्स आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स या कंपन्यांनी सार्वजनिक निधी इतरत्र वळल्याचा आरोप आहे. येस बँकेने २०१७ ते २०१९ दरम्यान, आरएचएफएलमध्ये २,९६५ कोटी रुपये आणि आयएफसीएलमध्ये २,०४५ कोटी रुपये गुंतवले. नंतर ही गुंतवणूक निष्क्रिय झाली. डिसेंबर २०१९ पर्यंत आरएचएफएलसाठी १,३५३.५० कोटी रुपये आणि आयएफसीएलकडून१,९८४ कोटी रुपये थकित राहिले.

## आरक्षणासाठी निवडणूक आयोग पुन्हा लॉटरी काढण्याची शक्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यात आल्याने हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. या सुनावणीत न्यायालयाने अतिरिक्त आरक्षण कमी करण्याचे आदेश दिले, तर जिथे आरक्षण मर्यादा ओलांडली गेली आहे तेथे आरक्षित प्रभागांची संख्या कमी केली जाईल. त्यासाठी लॉटरी हा एक पर्याय असू शकतो. मात्र, न्यायालय काय निर्णय देते, यावर पुढील प्रक्रिया अवलंबून राहील, अशी माहिती निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी दिली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ओबीसींसाठी सरसकट २७ टक्के आरक्षण लागू ▶▶ पान २ वर

### तो पर्यंत जिप.पंस.निवडणूक कार्यक्रम जाहीर नाही

न्यायालयाची पुढील सुनावणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही. तसेच, या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची अजून नेमणूक झालेली नाही. याबाबत महसूल विभागाकडून अहवाल मिळालेला नाही. नियुक्त झालेले निवडणूक निर्णय अधिकारी हजर झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आयोगाकडून जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असेही सूत्रांनी स्पष्ट केले.

## कोट्यावधीच्या महसूल घोटाळ्याची व्याप्ती वाढणार

### विभागीय आयुक्तांनी घातले लक्ष, जुन्या फाईल मागवल्या

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामधून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग पहिल्या नगर बीड परळी रेल्वे मार्ग यामध्ये संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा मिळू नये अधिकच्या मावेजासाठी शासकीय अधिकारी कर्मचारी वकील यांची रॅकेट उघड आल्यानंतर या २४१ कोटीच्या घोटाळ्याची व्याप्ती आता अधिक वाढणार असल्याचे चित्र दिसत आहे. जुन्या भूसंपादनाच्या फायली देखील विभागीय आयुक्तांनी मागवल्या आहेत त्यामुळे या घोटाळ्याची व्याप्ती अधिक वाढणार असल्याचे दिसत आहे.**





बीड जिल्ह्यात शासनाच्या विविध उपक्रमांतर्गत संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा मिळूनही वाढीव मावेजा देण्यासाठी अनेक फाईल मांडण्यात आल्या जवळपास ५४ फाइल्स मधून १४१ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली त्यानुसार ७३ कोटी रुपये वितरितही केले गेले, मात्र अनेक फाईल ह्या संशयास्पद असल्याने या प्रकरणाचा भांडाफोड झाला. यामध्ये महसूल अधिकारी कर्मचारी आणि वकिलाचे मोठे रॅकेट बाहेर आले. या सर्वावर गुन्हे दाखल झालेले असताना, आता या प्रकरणाची गंभीर दखल विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी घेतली आहे. त्यांनी यावर पुन्हा एकदा चौकशी सुरू केली असून, भूसंपादनाच्या जुने रेकॉर्ड त्यांनी मागवले आहे. विशेषतः ज्या फाईल लवादा पुढे होत्या, त्यावर ज्या जिल्हाधिकाऱ्यांची ▶▶ पान २ वर

## राज्यात हुडहुडी कायम राहणार



**पुणे । प्रतिनिधी**

राज्यभर थंडीचा कडाका कायम असून उत्तर भारतातील थंडीची लाट महाराष्ट्रातही परिणामकारक ठरत आहे. उत्तरेकडून येणाऱ्या बर्फाळ वाऱ्यांच्या प्रवाहामुळे तापमानात सातत्याने घट होत आहे. गुरूवारी धुळे येथे राज्यातील निचांकी ६.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवस राज्यभर अशीच थंडी कायम ▶▶ पान २ वर

## हत्येचा कट रचणाऱ्याला फडणवीस, अजित पवारांचे संरक्षण–जरांगे पाटील


**जालना । प्रतिनिधी**

**माझ्या हत्येच्या कटातील मुख्य सूत्रधाराला वाचवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पूर्ण ताकद लावत आहेत असा अत्यंत गंभीर आरोप करत मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी सरकारवरचा पूर्ण विश्वास उडाल्याचे जाहीर केले आहे. त्यांनी गुरुवारी (२० नोव्हेंबर) प्रसार माध्यमांशी बोलताना आपण दिलेले पोलीस संरक्षण नाकारल्याचे स्पष्ट केले.**



जरांगे यांनी बुधवारी पोलिस अधीक्षकांना अर्ज देऊन पोलीस संरक्षण काढण्याची मागणी केली होती. गुरुवारी त्यांनी याची अंमलबजावणी केली. आम्ही अर्ज दिला आणि अंगरक्षकांना (पोलिसांना) सांगितले, तुम्ही सोबत येऊ नका. पोलिस सोबत येऊ दिले नाही. तुम्ही आतापर्यंत सेवा दिली, त्याबद्दल सर्व पोलीस बांधवांचे मनापासून सन्मान करतो, असे भावनिक विधान करत त्यांनी पोलिसांना गाडीतही बसू दिले नाही आणि सोबतही घेतले नाही. जीवन जगत असताना खोटे वागायचे नाही, त्यामुळे आम्हाला सरकारने दिलेले पोलीस संरक्षण नको, कारण आमचा सरकारवरचा पूर्ण विश्वास उडाला आहे असे जरांगे यांनी स्पष्ट केले. जरांगे यांनी यावेळी धनंजय मुंडे ▶▶ पान २ वर

## बीड–अहिल्यानगर महामार्गावर बिबट्याचा संचार



**बीड । प्रतिनिधी**

बीड आणि अहिल्यानगर राज्य महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांसाठी ही धोक्याची घंटा असून, आष्टी वनपरिक्षेत्र हद्दीत बिबट्यांची संख्या वाढल्यामुळे आता ते शेत आणि लोकवस्तीसह थेट महामार्गावर येत असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. १९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या दरम्यान कानिफनाथ घाटात बिबट्या पुन्हा एकदा प्रवाशांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केला असून, हा व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे.

काही दिवसांपूर्वी १५ ऑक्टोबर ▶▶ पान २ वर

## ईव्हीएमद्वारे निवडणूक, सरकारचे प्रतिज्ञापत्र दाखल, शुक्रवारी पुढील सुनावणी

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'ईव्हीएम'द्वारे घेण्यासाठी स्वत:च प्रक्रिया निर्धारित केली आहे. यासंदर्भात २००४ ते २०१६ पर्यंत विविध आदेश जारी करण्यात आले आहेत. आयोगाने शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दाखल करून ही माहिती दिली.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांनी गुरुवारी निवडणूक आयोगाचे प्रतिज्ञापत्र रेकॉर्डवर घेऊन या ▶▶ पान २ वर

## देवेंद्र फडणवीस हे राज्याचे शॅडो मुख्यमंत्री–हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीस हे राज्याचे शॅडो मुख्यमंत्री आहेत, तर प्रत्यक्ष निर्णय दिल्लीतील नेतृत्वाकडून घेतले जातात. अमित शहा हेच राज्याचे मूळ मुख्यमंत्री आहेत, असा निशाणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी साधला. ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.०० क्विंटल | २,२०० | २,७९१ | २,५१६ |
| ज्वारी/हायब्रिड : ७९.०० क्विंटल | २,४१० | ४,००१ | ३,१८५ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ०.५० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| उडीद : २७.०० क्विंटल | ३,००० | ५,२५० | ४,४६४ |
| बाजरी:२६.०० क्विंटल | २,५०० | ३,००० | २,८१० |
| मुग: २.०० क्विंटल | ५,१०० | ५,७०० | ५,४०० |
| सोयाबीन: ३१५.५० क्विंटल | ३,९०० | ४,८०० | ४,५२५ |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,००० | ४,१०० | ४,०५० |

## राज्यपालांवर वेळेचे बंधन घालता येणार नाही; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सर्वोच्च न्यायालायत गुरूवारी राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या १४ प्रश्नांवर सुनावणी होती. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारने मंजुरीसाठी पाठवलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपालांवर वेळेचे बंधन घालता येणार नाही असे म्हटले आहे. हा निर्णय चीफ जस्टीस बीआर गवई यांच्या अध्यक्षतेखालील पाच जजेसच्या बेंचने दिला आहे.**



सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना राज्य किंवा केंद्र सरकारने मंजुरीसाठी पाठवलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी कोणतेही वेळेचे बंधन घालता येणार नाही, असा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. पाच न्यायमूर्तींच्या बेंचने ज्यावेळी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांची कृती जस्टिसेबल नसेल आणि हे विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल त्याचवेळी न्यायव्यवस्थेकडे त्याची परीक्षण होईल असे देखील म्हटले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या अधिकारांबाबतचे १४ प्रश्न विचारले होते. त्यावरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. तत्पूर्वी, दोन जजेसच्या बेंचने तामिळनाडू सरकारच्या विधेयक मंजुरीसाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींवर वेळेचे बंधन घालण्याच्या याचिकेवर तमिळनाडू सरकारच्या बाजूने निर्णय दिला होता. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# महायुतीत टोकाची नाराजी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर अनेक राजकीय पक्ष आपली ताकद वाढवण्याच्या प्रयत्नात आहेत. आपल्या पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना बळ देण्याच्या प्रयत्नात आपण काय करतो आहोत याचे भानच त्यांना राहिले नाही. यातूनच संघर्षाचे, फोडाफोडीचे राजकारण सुरू झाले आहे. युती, आघाडी सांभाळायची, टिकवायची झाल्यास त्या त्या पक्षांनी काही पथ्ये पाळावी लागतात, पण तीच पाळली जात नाहीत. फोडाफोडीच्या प्रयत्नात आपण आपल्याच मित्र पक्षाचे कार्यकर्ते फोडत आहोत याचेही भान राहिनासे झाले आहे. त्यामुळे आपापसातच संघर्ष पेटला आहे. सध्या महायुतीत तीच धुसफूस सुरू आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजप यांच्यातील धुसफूस वाढू लागली आहे. शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी मंगळवारी झालेल्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कॅबिनेट बैठकीला उपस्थित होते, पण सेनेच्या अन्य मंत्र्यांनी बैठकीला दांडी मारली. भाजपकडून सुरू असलेल्या पळवापळवीमुळे शिंदेसेनेत नाराजी आहे.

शिंदेसेनेचे आमदार असलेल्या, वर्चस्व असलेल्या भागांमध्ये भाजपने आपली ताकद वाढवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शिंदेसेनेत अस्वस्थता निर्माण झाली आहे. आपल्या पक्षाचा वरचष्मा दाखवण्यासाठी महायुतीतच माजी आमदार, माजी नगरसेवकांची पळवापळवी सुरू झाली आहे. उल्हासनगरमधील भाजपच्या सहा माजी नगरसेवकांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आणि महायुतीत धुसफूस सुरू झाली. प्रत्युत्तर म्हणून डोंबिवलीतील शिंदेसेनेच्या माजी नगरसेवकांना भाजपने आपल्या पक्षात खेचून आणत शिंदेसेनेला चपराक लगावली. या पार्श्वभूमीवर मंगळवारी मंत्रिमंडळाची बैठक सुरू होण्याआधी शिवसेना मंत्री प्री-मीटिंगला उपस्थित राहिले. मात्र, मंत्रिमंडळ बैठकीवर शिवसेना मंत्र्यांनी बहिष्कार टाकत आपली नाराजी प्रकट केली. त्यानंतर शिवसेना मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपली नाराजी त्यांच्या कानावर घातली. मात्र, आधी तुम्ही फोडाफोडीला सुरुवात केली, असे सांगत पथ्य सगळ्यांनीच पाळा, असा दम मुख्यमंत्र्यांनी शिवसेना मंत्र्यांना भरल्याचे सांगितले जाते. पण प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही तर एकनाथ शिंदे यांनी थेट दिल्ली गाठली आणि गृहमंत्री असलेले आणि महायुतीत समेट घडवणारे अमित शहा यांच्याकडे तक्रार केली. शिंदे यांनी तक्रार केली खरी मात्र शहा यांनी त्याला फारसे महत्व दिले नसल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यात डिसेंबर २०२४ मध्ये महायुतीची सत्ता पुन्हा स्थापन झाली. त्यावेळेपासून भाजपविरुद्ध शिवसेनेत सतत वाद सुरू आहे. शिंदेसेनेच्या कल्याण-डोंबिवलीतील काही माजी नगरसेवकांना भाजपने पक्षात प्रवेश दिल्याने शिंदे गटात नाराजी पसरली. केवळ याच ठिकाणी नाही, तर अन्य ठिकाणीही भाजपने शिंदेसेनेला शह देण्याचा आणि कमकुवत करण्याचा प्रयत्न केला आहे.


याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न केला असता ते म्हणाले, प्रत्येकजण आपापला पक्ष वाढवण्याचा प्रयत्न करत असतो. हे प्रमाण निवडणुकीच्या काळात वाढलेले असते. तिकिटे देण्याच्या निमित्ताने त्यात वाढ होते. उबाठा नेते आदित्य ठाकरे यांनी ट्विटरच्या माध्यमातून शिंदेसेनेवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, मंत्रिमंडळ बैठका जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी असतात, तुमचे रुसवे-फुगवे सांभाळण्यासाठी नाही. हा सारा कारभार पाहता महाराष्ट्रासाठी हे सारं चिंताजनक आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकत्र बसून मंत्र्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर यापुढे एकमेकांच्या पक्षातील कार्यकत्यांना प्रवेश देणे टाळावे. दोन्ही पक्षांनी ही पथ्ये पाळली पाहिजेत. त्यामुळे यापुढे कोणालाही पक्ष प्रवेश देऊ नये असा तोडगा निघाला असून हा प्रश्न येत्या दोन-चार दिवसांत मार्गी लागेल, असे मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले. शिवसेना-भाजप युती नैसर्गिक आहे आणि दोन्ही पक्षांत कोणताही वाद नाही असे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे कितीही म्हणत असले तरी दोन्ही पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी आसुसलेले आहेत हे सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ आहे. निवडणुकीच्या निमित्ताने त्यांच्यातील हेवेदावे उघड होत आहेत, झाले आहेत. भाजपची कार्यपद्धती हिडीस, किळसवाणी असल्याची टीका डोंगर फेम आमदार शहाजी पाटील यांनी केली आहे. आता हे नाराजी नाट्य आणि फोडाफाडी कोणते वळण घेते हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

# माजी सरपंच बाबासाहेब सोमधाणे यांचा जालन्यात खून

**जालना । प्रतिनिधी**

जालन्यात एकाची तलवारीने वार करत निर्घृण खून करण्यात आलीय. माजी सरपंच बाबासाहेब सदाशिव सोमधाणे (वय ४५ वर्ष) असं मयताचे नाव आहे. जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे. सायंकाळच्या पाच वाजेच्या दरम्यान टाटा सुमो गाडीतून ४ ते ५ जण आले आणि त्यांनी भररस्त्यात तलवारीने वार करत बाबासाहेब सदाशिव सोमधाणे याची खून केली. मयत बाबासाहेब सोमधाणे हे जालना तालुक्यातल्या अहंकार देऊळगाव येथील माजी सरपंच असल्याची माहिती असून राजकीय वादातून ही हत्या झाल्याचं बोललं जात आहे. गाडी क्र. चह २० बीवाय ७८४१ ने मयत बाबासाहेब सोमधाणे अंबड चौफुली कडून नवीन जालना कडे जात होते यादरम्यान अंबड चौफुली परिसरातील जांगडे पेट्रोल पंप समोर भर रस्त्यातच टाटा सुमो गाडी (क्र. चह ०४ ऋऊ ०५०९) तून आलेल्या चार ते पाच जणांनी त्याची तलवारीने वार करत निर्घृण हत्या केली. या घटनेनंतर आरोपी हे एका स्विफ्ट गाडीतून पसार झाले. सदरील घटना भाजी मार्केट रस्त्यावर घडली या घटनेमुळे जालना शहरात खळबळ उडाली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केलाय.


घटनेची माहिती मिळताच जालना जिल्हा अप्पर



पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे, कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे हे आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

# आभा गणेश मुंडे हिला ५० मीटर स्पर्धेत फ्रीस्टाइल गोल्ड मेडल पटकावले

**बीड प्रतिनिधी**



**हैदराबाद येथे झालेल्या पंचविसाव्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील आभा गणेश मुंडे हिने ५० मीटर फ्रीस्टाइल गोल्ड मेडल ,१०० मीटर बॅक स्ट्रोक मध्ये गोल्ड मेडल व १०० मीटर बटरफ्लाय मध्ये पण गोल्ड मेडल पटकावले तसेच महाराष्ट्र टीमच्या १००*४ फ्री स्टाईल रिले व १००*४ मिक्स मिडले रिले प्रकारात मध्ये तिने दोन गोल्ड मेडल पटकावले असे एकूण तिने पाच सुवर्णपदकांची कमाई २५ व्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेमध्ये केली.**

आभा मुंडे हिने हे पाच सुवर्णपदके पटकवल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या गोल्ड मेडल सुवर्णपदकामुळे अख्ख्या बीड जिल्ह्याचेच नव्हे तर अख्या महाराष्ट्राचे नाव लौकिक केले आहे. यादीच्या यशाबद्दल प्रत्येक विद्यार्थ्यांनी काहीतरी केले पाहिजे आणि आपल्या आई-वडिलांचे नावलौकिक केले पाहिजे . महाराष्ट्र बाहेर हैदराबाद सारख्या शहरांमध्ये जाऊन या स्पर्धेत भाग घेऊन तीन मेडल मिळवत महाराष्ट्राच्या स्पर्धेमध्ये दोन मेडल असे एकूण पाच मेडल मिळवल्याबद्दल तिचे सर्व स्तरावरून अभिनंदन करत तिचे कौतुक होत आहे. आभा मुंडे ही परळी तालुक्यातील आहे त्यामुळे तिने परळीचेच नाही तर पूर्ण बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राचे नाव लौकिक केले आहे.

# भाचाला वाचवण्यासाठी मामीची विहिरीत उडी भाचा व मामीचा मृत्यू

**जालना । प्रतिनिधी**

**टायर विहीरीच्या दिशेने जात असताना त्याला पकडण्यासाठी पळालेला चिमुकला भाचा टायरासहीत विहीरीत पडल्याचे कळताच त्याला वाचवण्यासाठी मामीने कसलाही विचार न करता थेट विहीरीत उडी घेतली. माञ पोहता येत नसल्याचे दोघांही मामी-भाच्याचा पाण्यात बुडून मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना बदनापुर तालुक्यातील मालेवाडी गावात घडली.**





सध्या उसतोडीचा हंगाम सुरु असल्याने पोटाची खळगी भरण्यासाठी ग्रामीण भागातील उसतोड कामगार बाहेर गावी जातात अशाच एक परिवार आपल्या सात वर्षाच्या चिमुकला रुद्रा वैजिनाथ थोरात ला त्याच्या बदनापुर तालुक्यातील मालेवाडी येथील विलास भालेराव या मामाकडे सोडले होते. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी १ च्या सुमारास रुद्रा थोरात हा मामी आरती भालेराव सोबत शेतात गेला होता. दरम्यान चिमुकल्याचा मामा विलास भालेराव हा बदनापुरला दवाखान्यात गेला होता. शेतात दोघे असताना रुद्रा हा टायर खेळत होता. खेळता खेळता रुद्राचे टायर विहीरीच्या दिशेने गेले. त्याच वेळी टायर पकडण्यासाठी रुद्राही विहरीच्या दिशेने पळाला माञ टायरच्या मागे पळता पळता रुद्रा सरळ विहीरीत पडला. रुद्रा विहीरात पडल्याचे कळताच शेतात आजु-बाजुला कोणीच नसल्याने भाच्याला वाचवण्यासाठी मामीने काहीही विचार न करता सरळ विहीरित उडी घेतली. परंतु पोहता येत नसल्याने दोघांचा ही बुडुन दुर्देवी मृत्यु झाला. सायंकाळी बदनापुरहुन आलेल्या विलासला शेतात कोणीही दिसत नसल्याने शोधाशोध केली. त्यावेळी विहिरीच्या काठावर चपला दिसताच घाबरलेल्या विलासने लोकांना बोलावुन विहीरीत शोध घेतला आणि दोघा मामी भाच्याचे मृत्युदेह बाहेर काढले. या प्रकरणी बदनापुर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्युची नोंद. बदनापुर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले आहे. दरम्यान या घटनेमुळे गावात व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाचा सर्वात तरुण उमेदवार रवी बागल

**बीड । प्रतिनिधी**

**नगरपालिका निवडणुकीमध्ये अनेकांनी आपले नशीब आजमावून सुरू केली असले तरी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने बीड नगरपालिकेत सर्वात तरुण उमेदवाराला संधी दिली तो उमेदवार म्हणजे रवी जय मल्हार बागल.**

बीड नगरपालिका निवडणुकीमध्ये अनेक कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी उमेदवारीसाठी जीवाचे रान केले यामध्ये मोंढा भागातील आमदार संदीप क्षीरसागर यांचे कट्टर समर्थक जय मल्हार आसाराम बागल यांनी उमेदवारीची मागणी केली होती त्यांचे या भागामध्ये मोठे कार्य आहे परंतु ऐनवेळी त्यांनी त्यांच्या ऐवजी मुलाचे नाव पुढे केले शेवटी पक्षश्रेष्ठींनी त्यांचा मुलगा रवी जय मल्हार बागल याला उमेदवारी दिली. बीड नगरपालिका क्षेत्रात आणि मराठवाड्यामध्ये सर्वात कमी वयाचा उमेदवार म्हणून रवी बागल यांच्याकडे पाहिले जात आहे रवी बागल यांच्या पेक्षा त्यांच्या वडिलांचे कार्य या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे त्याचा फायदा रवी बागल यांना नक्कीच होईल यात शंका नाही या भागातून अनेक जण इच्छुक होते गेली अनेक



वर्ष संदीप क्षीरसागर यांच्याशी एकनिष्ठेने काम करणारे व्यक्ती म्हणून जय मल्हार बागल यांच्याकडे पाहिले जात होते बागल यांनी आपल्या कुटुंबावर घरावर तुळशीपात्र ठेवत आमदार संदीप क्षीरसागर आणि पक्षाचे काम इमान ईदबारी केले त्याचे फलित म्हणून त्यांच्या मुलाला उमेदवारी दिली गेली असे असले तरी त्यांचा मुलगा आजही १९ वर्षाच्या आत असल्याने सर्वात तरुण उमेदवार म्हणून त्याची नोंद होत आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द डॉक्टर जगदीश टेकाळे मानसोपचार तज्ञ आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या बीड शहरामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द मानसोपचार तज्ञ डॉ.जगदीश टेकाळे हे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी खालील आजाराचे निदान करण्यासाठी उपलब्ध रहात आहेत. १) डोकेदुखी/अती चिंता व काळजी (सतत टेन्शन,घाबरटपणा, घाम सुटणे,थरकाम सुटणे,हाता पायांना मुंग्या येणे)२) नैराश्य/ उदासिनता (मनात सतत एक सारके विचार येत राहणे, सतत शंका व्यक्त करणे,अंधारात स्वतःला कोंडून घेणे)३) झोपेच्या समस्या (झोप न येणे, झोपेत चालणे,बडबड करणे,चक्कर येणे, दातखिळी बसणे)४) व्यसनाधिनता (दारु,तंबाखू,गुटखा,मोबाईल गेम,गांजा,चरस,भांग व इत्यादी तत्सम प्रकारच्या व्यसनापासुन मुक्ती)५) बालकांच्या समस्या (झोपेत लघवी करणे, हठ्ठीपणा,चिडचिड पणा,अभ्यासात कमी,अति चंचलता, मतिमंदता, वागणुकीतील बदल,शैक्षणिक समस्या)६) स्मृती भंग (विसरभोळेपणा)७) लैंगिक समस्या (लवकर वीर्य पतन होणे, सेक्सची इच्छा न होणे, कमजोरी, स्वप्न दोष,कमी ताठरता,)८) स्क्रिझेफ्रेनिया व इतर मानसिक समस्या ९) मानसिक आजार १०) विसर पडण्याचा आजार११) मानसिक आजारावरील उपचार (संशय घेणे,भुतबाधा,भास होणे,करणी, वेडेपणा इत्यादी)१२)उदासिनता (घबराहट, भिती,आत्महत्येचे विचार,ऐकटेपणा,व्यक्तिमत्व आजार,डोके दुखी व बऱ्याच दिवसापासून होणारी अंगदुखी,सतत चक्कर येणे,एकच विचार,एकच कृती वारंवार करणे.१३) म्हतारपणातील आजार (स्मृतीभ्रंष,निद्रानाष,वेडेपणा,ऐकाकीपणा)१४) समुपदेशन (वैवाहिक व कौटुंबिक कलह,करिअर,अभ्यास,प्रेमभंग इत्यादी)१५) समुपदेशन/कौन्सेलिंग/थेरपी १६) ताणतणाव नियोजन १७) राग/संताप नियोजन १८) अभ्यास मार्गदर्शन १९) मनोलैंगिक समस्या : लैंगिक कमजोरी, शीघ्रपतन, स्वप्नदोष,लैंगिक समाधान, इच्छेचा अभाव, २०) नैराश्य, उदासपणा, मानसिक ताणतणाव, आत्महत्तेचे विचार २१) मनात एकच विचार/शका वारंवार येणे, वारंवार एकच कृती करणे २२) वयसकर माणसांच्या विसरण्याची सवय २३) सर्व तपासण्या/रिपोर्ट नॉर्मल असूनही सतत शारिरिक त्रास होणे. २४) आपल्याला काहीतरी गंभीर आजार असेल किंवा होईल याची भिती वाटणे. २५) झोपेच्या समस्या, सतत चिंता काळजी, जुनाट डोकेदुखी, दातखिळी बसणे. २६) असंबंध बडबड, भिती संशय, भास होणे. २७) लहान मुलांच्या समस्या : अभ्यासात लक्ष नसणे, हट्टीपणा, अतिचंचलता, झोपेत लघवी होणे, मतिमंद मुलांच्या वर्तणुकीच्या समस्या. २८) व्यसनांच्या समस्या : दारु, सिगारेट, तंबाखू, गुटखा, मावा, इ.२९) व्यसनमुक्ती/ नशामुक्ती वरील उपचार साठी डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.



## पान १ वरून...

### कीटकनाशकांमुळे शेतकऱ्यांना

नेमका कोणता परिणाम होतो याचा अभ्यास केला. ८०८ शेतकरी कुटुंबांची तपासणी करणाऱ्या आयसीएमआर संशोधकांना असे आढळून आले की २२.३% कुटुंबांना सौम्य संज्ञानात्मक कमजोरी (एमसीआय), नैराश्य किंवा दोन्हीच्या संयोजनाची लक्षणे जाणवली. यापैकी अनेक शेतकऱ्यांनी गेल्या काही वर्षांत शेती करताना कीटकनाशकांच्या नियमित संपर्कात आल्याचे नोंदवले. प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, ज्यांनी आठवड्यातून किमान एकदा कीटकनाशके फवारली त्यांना मानसिक आरोग्य समस्यांचा धोका २.५ पट वाढला. संशोधकांच्या मते, या पॅटर्नवरून स्पष्टपणे दिसून येते की, कीटकनाशकांचा संपर्क येणाऱ्यांना न्यूरोसायकिएट्रिक विकारांच्या म्हणजे मेंदू आणि मन या दोन्हीला प्रभावित करणारे डिप्रेशन (नैराश्य), स्कीझोफ्रेनिया (छिन्नमनस्कता), ऑटिझम (स्वमग्नता), अल्झायमर, एकाग्रतेचा अभाव आणि अतिचंचलता विकार होण्याचा धोका आहे.

-------

### कोट्यावधीच्या महसूल

सही होती त्या जिल्हाधिकाऱ्यांना देखील आता चौकशीच्या घेऱ्यात घेतले जाणार आहे. विशेष म्हणजे केवळ २४१ कोटीचा हा विषय नसून, यापेक्षाही अधिक रकमेचा घोटाळा असल्याचा संशय आहे. याच घोटाळ्यामध्ये ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली, त्यातील सहाय्यक महसूल अधिकारी संजय हंगे हे महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आहेत. प्रामुख्याने यामध्ये बहुतांशी कंत्राटी कर्मचारी असून या कर्मचाऱ्यांना हाताशी धरून हा सर्व प्रकार केला आहे. विशेषता यामध्ये हे देखील काही काळ वकील संघाचे अध्यक्ष होते त्यांच्यासह अन्य चार वकील देखील यात दोषी असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या महसूल घोटाळ्याची व्याप्ती आणखी वाढणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

------------

### बीड-अहिल्यानगर महामार्गावर

रोजी याच घाटात बिबट्याचे दर्शन झाल्याचा व्हीडीओ व्हायरल झाला होता. आता अवघ्या महिनाभरात १९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या वेळी बिबट्या पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी भीती निर्माण झाली आहे. बिबटे हे निशाचर (रात्री सक्रिय) प्राणी आहेत. डोंगरपट्ट्यात त्यांचा नैसर्गिक अधिवास असला तरी, शिकारीसाठी ते लोकवस्तीकडे धाव घेतात. अनेक शेतकऱ्यांच्या शेळ्या, वासरे आणि श्वानांचा फडशा त्यांनी पाडला आहे. आता रस्त्यावर त्यांचा बिनधास्त संचार सुरू असल्याने प्रवाशांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. वनविभाग केवळ शेळ्या, वासरे यांचा फडशा पाडल्यावर पंचनामा करून नुकसान भरपाई देते. पण ही नुकसान भरपाई देण्याऐवजी त्या बिबट्याचा बंदोबस्त करायला हवा. पाळीव प्राण्यांचा जीव जातोय, उद्या माणसाचा जीव गेल्यानंतर तुमची मदत काय कामाची? अनेक वेळा मागणी करूनही वनविभागाकडून कसलीच उपाययोजना होत नाही. बिबट्यांचा बिनधास्त वावर पाहता, वनविभागाने याची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.

----------

### हत्येचा कट रचणाऱ्याला फडणवीस,

यांच्यावर आपला घातपात करण्याचा कट रचल्याच्या आरोपाचा पुनरुच्चार करत, फडणवीस आणि अजित पवार यांच्यावर तोफ डागली. एवढा मोठा घातपाताचा कट धनंजय मुंडेकडून होत आहे, त्याला वाचवायचे काम अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस करत आहेत, असे म्हणत जरांगे यांनी या प्रकरणातील मुख्य आरोपीला पाठबळ दिल्याबद्दल अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांना जबाबदार धरले आहे. ते पुढे म्हणाले, माझ्या हत्येच्या कटातील मुख्य सूत्रधार धनंजय मुंडे आहे, आता आम्ही आमचे बघू. आता मैदान मोकळे आहे, येऊ द्या त्याचे कोण कोण यायचे ते. बघू आम्ही. आता अंगावर आल्यावर वापस कसे जातात! आता जे आरोपी पकडलेले आहेत, ते स्पष्टपणे त्याला (धनंजय मुंडे) बोललेले आहेत. फोनवरती सगळे कट रचलेले आहेत. तो कोण बडा आहे, तो अजून धरलेला नाही. हे सगळे मोठे षडयंत्र रचण्यात आले होते असे जरांगे म्हणाले. माजी मंत्री आणि आमदार आहे म्हणून तुम्ही सोडून देणार का? नसता त्याला चौकशीसाठी पाठवले असते, त्याला अटक केली असती, असे जरांगे म्हणाले.

------------

### राज्यात हुडहुडी

राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

महाराष्ट्रातील खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या भागांत थंडीचे प्रमाण सर्वाधिक जाणवत आहे. सकाळी आणि रात्रीच्या वेळी गारठा वाढत असून अनेक भागात दवबिंदूची मात्रा देखील जास्त आहे. कोकणात मात्र थंडीचे प्रमाण तुलनेने कमी आहे. समुद्रकिनाऱ्यालगतचे हवामान तुलनेने सौम्य असल्याने येथे कमाल तापमानात किंचित वाढ दिसून येत आहे. रत्नागिरी आणि हर्णे येथे ३५ अंश सेल्सिअस इतके उचांकी तापमान नोंदले गेले, जे या हंगामासाठी तुलनेने जास्त मानले जाते. राज्यातील इतर भागांतही थंडी वाढलेली आहे. धुळे : ६.५ (राज्यातील सर्वात कमी तापमान), निफाड ७.४. जेऊर ८, अहिल्यानगर ९.४, आणि मालेगाव व नाशिक ९.८ असे तापमान होते. मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश भागात किमान तापमान १० ते १२ अंश दरम्यान आहे, तर खानदेशाचा मोठा भाग १० अंशांच्या आसपास थंडीत गारठून गेला आहे. रात्री आणि सकाळची थंडी आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे हवामान तज्ज्ञांनी सांगितले आहे. पुढील चार दिवस राज्यात हुडहुडी वाढणार, अशी हवामान खात्याची शक्यता असून नागरिकांनी ऊबदार कपड्यांचा वापर, विशेषतः वयोवृद्ध आणि लहान मुलांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

------------

### आरक्षणासाठी निवडणूक आयोग

केल्याने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका आणि नगरपालिका व नगरपंचायती यामध्ये ओलांडण्यात आल्याप्रकरणी धुळ्यातील राहुल रमेश वाघ आणि किसनराव गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर बुधवारी (दि.१९) सुनावणी होणार होती. मात्र, आता ही सुनावणी पुढील आठवड्यात मंगळवारी (दि.२५) होणार आहे. या सुनावणीवेळी न्यायालय काय निर्णय देते, याकडे राज्य निवडणूक आयोगाचे लक्ष लागले आहे. न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून आरक्षणात सुधारणा करण्याची तयारी आयोगाने ठेवली आहे. महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकांत आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. मात्र, या निर्देशांनंतरही काही जिल्ह्यांत मर्यादा ओलांडली गेली आहे. तर, काही जिल्ह्यांमधील नगरपंचायतींमध्ये ५० टक्क्यांवर आरक्षण गेल्याचे आढळून येत आहे. मात्र, हे प्रमाण फारसे नाही, असे नगरविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. तर, सुनावणीत न्यायालयाने जास्तीचे आरक्षण कमी करण्याचे आदेश दिले.

--------------

### देवेंद्र फडणवीस हे राज्याचे शॅडो

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, हे लोक सत्तेसाठी एकत्र आले आहेत, पण त्यांच्या विचारांत जमिन-अस्मानाचा फरक आहे. त्यामुळेच महायुतीत गटबाजीचे युद्ध सुरू आहे. दिल्लीत जाऊन शिंदे अमित शहांना भेटले, कारण खरे मुख्यमंत्री अमित शहा आहेत आणि देवेंद्र फडणवीस शॅडो मुख्यमंत्री म्हणून काम करत आहेत. महाराष्ट्रातील सर्व कारभार दिल्लीतून चालतो. एखादा मंत्री नेमायचा असला तरी अमित शहांचा शब्द अंतिम असतो. अगदी किरकोळ तक्रारीसुद्धा दिल्लीपर्यंत पोहोचवाव्या लागतात. हे सरकार महाराष्ट्राचा स्वाभिमान गहाण ठेवून दिल्लीच्या आदेशावर चालत आहे, असे म्हणत त्यांनी महायुतीवर हल्लाबोल केला. नागपूर काँग्रेसमधील कथित राजीनाम्यांबाबत विचारले असता हर्षवर्धन सपकाळ यांनी सावध भूमिका घेतली. ''माध्यमांतून मला तशी बातमी मिळाली आहे, पण आतापर्यंत माझ्याकडे कोणताही राजीनामा किंवा लेखी तक्रार आलेली नाही,'' असे ते म्हणाले. तसेच, महापालिका निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ''आमची भूमिका ठाम असून इंडिया आघाडीच्या बाहेर युती करायची असल्यास स्थानिक नेत्यांनी प्रस्ताव सादर करावा, नाहीतर आम्ही एकटे लढू,'' असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच ''शरद पवार हे इंडिया आघाडीचे महत्त्वाचे नेते आहेत. त्यांच्याशी सतत समन्वय राहील. कालही आमचे नेते त्यांना भेटले. नगरपरिषद निवडणुकांसाठी महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांची समन्वय बैठक झाली असून आजही चर्चा होईल.'' असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

------------

### राज्यपालांवर वेळेचे बंधन घालता

त्यानंतर राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे १४ प्रश्न पाठवून राष्ट्रपती, राज्यपालांच्या अधिकारांबाबत सर्वोच्च न्यायालयाचे मत मागवले होते. राष्ट्रपतींनी घटनेच्या कलम १४३ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे हे मत मागवले होते. राष्ट्रपतींनी ज्यावेळी भारतीय राज्यघटनेच्या कलम २०० अन्वये एखादे विधेयक हे राज्यपालांकडे संमतीसाठी सादर केले जाते त्यावेळी मंत्रीगटाचा सल्ला मान्य करणे बंधनकार आहे का असा देखील प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी घटनेतील कलम ३६१ चा हवाला देत राष्ट्रपती किंवा राज्यपाल हे त्यांची कार्यालयीन कर्तव्ये पार पाडत असताना कोणत्याही न्यायालयाला बांधील नसतात असे सुचीत केले होते. सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश बीआर गवई यांच्या अध्यक्षतेखालच्या पाच जजेसच्या बेंचने राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी वेळेचे बंधन घालणे हे घटनेच्या अगदी उलट असल्याचे म्हटले. या बेंचमध्ये जस्टीस सूर्यकांत, जस्टीस विक्रम नाथ, जस्टीस पीएस नरसिंहा आणि जस्टीस एएस चांदुरकर यांचा समावेश होता.

-------------

### ईव्हीएमद्वारे निवडणूक, सरकारचे प्रतिज्ञापत्र

प्रकरणावर शुक्रवारी पुढील सुनावणी निश्चित केली. पुढील सुनावणीत याचिकाकर्ते आयोगाच्या प्रतिज्ञापत्राला उत्तर देतील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'ईव्हीएम'सोबत 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग व्हावा किंवा हे शक्य नसल्यास बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घेतली जावी, यासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडधे यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. बुधवारी त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक नियमात ईव्हीएम वापरण्याची तरतूद नाही, अशी माहिती देऊन 'ईव्हीएम'द्वारे निवडणूक घेण्याची कृती अवैध आहे, असा दावा केला होता. त्यामुळे न्यायालयाने निवडणूक आयोगाला यावर स्पष्टीकरण मागितले होते. आयोगाने हे प्रतिज्ञापत्र दाखल केले.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात



### राज्यस्तरीय रंगोत्सव स्पर्धेमध्ये रायमोहा येथील जालंदर विद्यालयाचे यश

रायमोहा । प्रतिनिधी

रंगोत्सव सेलिब्रेशन नॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन या स्पर्धेमध्ये बीडच्या रायमोहा येथील श्री जालिंदरनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे.इयत्ता दहावीत शिकणारी दिशा विठ्ठल बंडगर या विद्यार्थिनी या स्पर्धेमध्ये राज्यातून चौथ्या क्रमांक मिळवला आहे.शाळेतील १४१ विद्यार्थी सहभाग घेतला होता. त्यापैकी ३७ विद्यार्थी बक्षीस पात्र झाले आहे. शाळेच्या वतीने या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. रायमोह या शाळेने या स्पर्धेच्या नियम अटी शर्ती अधीन राहून आपल्या शाळेतील १४१ विद्यार्थी सहभागी केले होते त्यापैकी ३७ विद्यार्थी बक्षीस पात्र झाले असून इयत्ता दहावी शिकणारी दिशा विठ्ठल बंडगर ही विद्यार्थिनी कलरिंग या स्पर्धेमध्ये राज्यातील सर्व सहभागी शाळेमधून चौथ्या क्रमांक मिळवला आहे तर बाकी अठरा विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल दहा सिल्वर मेडल तर आठ ब्रॉन्झ मेडल मिळून विध्यार्थ्यांनी भरघोष यश मिळवले आहे.यावेळेस या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शाळेचे अध्यक्ष प्रकाश आप्पा जाधव तसेच शाळेचे सचिव निजामुद्दीन शेख माजी सचिव मुराद शेख शाळेचे सहसचिव फारुख पठाण प्राचार्य परमेश्वर सानप सर व सर्व शिक्षक वृंद हजर होते यावेळी सर्व शिक्षकांनी मुलांचे अभिनंदन करून कौतुक केले.



**बीड : पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नतीने निवड झाल्याबद्दल मुकुंद सूर्यभान तांदळे यांचा उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी आर्थिक गुन्हे शाखा सहाय्यक पोलीस निरीक्षक भागीले, जिल्हा वाहतूक शाखा पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, डॉ. संजय तांदळे उपस्थित होते.**

### त्या सैतानाचा भर चौकात एन्काऊंटर करा-डॉ. संजय तांदळे

बीड । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे या गावातील कु. यज्ञा जगदीश दुसाने या तीन वर्षांच्या निरागस चिमुकलीचे एका हरामखोराने अंगणात खेळत असताना तिचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करून तिच्या तोंडावर राक्षसी पद्धतीने दगडाने ठेचून निघृण खून केला आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र हादरून गेला असून निःशब्द झाला आहे. त्या हरामखोर सैतानाला फाशीची शिक्षा दिली पाहिजे तथा कायद्याच्या चौकटीत राहून हैदराबाद घटनेप्रमाणे भर चौकात एन्काऊंटर करण्यात यावे अशी मागणी मातृभूमी प्रतिष्ठान, जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटना, मराठवाडा शिक्षक संघटनेच्या वतीने दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी प्रतिष्ठानचे तथा जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, सुदाम कोळेकर व मराठवाडा शिक्षक संघटनेचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे उपस्थित होते.

# पश्चिम महाराष्ट्रात चालतो, मग मराठवाड्यातील साखर कारखानदारांना २६५ जातीच्या उसाचे वावडे का ?

## एस.एम.देशमुख यांचा सवाल

बीड । प्रतिनिधी

साखर आयुक्तांचा आदेश आणि सक्त ताकीद असताना देखील मराठवाड्यातील अनेक साखर कारखाने फुले २६५ जातीच्या ऊसाची नोंद घेत नाहीत किंवा तो ऊस घ्यायलाही टाळाटाळ करतात, साखर सम्राटांना २६५ जातीच्या ऊसाचे वावडे का आहे ? असा सवाल ज्येष्ठ पत्रकार एस.एम.देशमुख यांनी केला आहे.

एस.एम.देशमुख यांनी साखर आयुक्तांना एक पत्र पाठवून साखर कारखान्यांच्या अरेरावी कडे आणि त्यांच्या आदेशाला कशी केराची टोपली दाखवली जातेय या वास्तवाकडे साखर आयुक्तांचे लक्ष वेधले आहे. साखर कारखाने २६५ जातीचा ऊस का घेत नाहीत ?या क्षेत्रातील काही जाणकारांशी चर्चा केली असता साखरेचा उतारा कमी येतो असा अनेक कारखानदारांचा गैर समज असल्याचं सांगणयात आलं. मात्र डिसेंबर-जानेवारीत म्हणजे योग्य वेळी ऊस तोड झाली तर



उतारा १४.४० टक्कया पर्यत येतो असंही हे जाणकार सांगतात..म्हणजे कारखानदार चुकीचा अर्थ काढून शेतकरयांची अडवणूक करीत आहेत असा आरोप एस.एम.देशमुख यांनी केला आहे..

२००७ मध्ये वसंतदादा शूगर इन्स्टिटयूट आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांनी फुले २६५ हा ऊसाचा वाण विकसित केला.. तेव्हाच या जातीची सर्व हंगामासाठी शिफारस केली गेली होती.. २००९ मध्ये अखिल भारतीय ऊस संशोधन संस्था लखनऊ (आयआयएसआर) यांनीही गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू या राज्यांसाठी २६५ या वाणाची शिफारस केलेली आहे.. महाराष्ट्रात ३२ टक्के क्षेत्रावर ही जात लावली जाते.. पश्चिम महाराष्ट्रात काही अडचण नाही पण मराठवाड्यातील कारखानदार शेतकरयांची अडवणूक करताना दिसतात..ही वस्तुस्थिती देशमुख यांनी पत्रात विषद केली आहे. शेतकरयांसाठी हा ऊस फायद्याचा आहे.. ऊस वजणदार भरतो, सरळ वाढ होत असल्याने तोड सोपी होते.. एकरी उत्पादन अन्य जातीच्या तुलनेत जास्त होते.. खोडकिड, शेंडेकिड, लोकरीमावा, कांडीकिड या रोगांचा प्रादुर्भाव या वाणावर तुलनेत कमी होतो.. कमी पाण्यात जास्त उत्पादन होत असल्यानं मराठवाड्यातील शेतकरी या वाणासाठी जास्त आग्रही असतात..महत्वाचे म्हणजे या जातीच्या ऊसाला डुकरांचा उपद्रव नसतो.. मात्र कारखानदार गैरसमजातून नोंदी घेत नाहीत आणि ऊस गाळपासाठी घेण्यासाठी देखील तयार नसतात असे देशमुख यांनी स्पष्ट केले आहे. नांदेडच्या प्रादेशिक सहसंचालकांनी नुकतेच एक परिपत्रक काढून २६५ जातीच्या नोंदी घेण्याच्या सूचना नांदेड, परभणी, लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांना दिल्या आहेत.. नोंदी घेतल्या नाही तर तक्रारी करण्याच्या सूचना देखील दिलेल्या आहेत, मात्र अशा तक्रारी देऊन साखर कारखान्याशी पंगा घ्यायला कोणताही शेतकरी तयार नसतो.. त्यामुळं साखर आयुक्तांनीच २६५ जातीच्या वाणाची किती नोंद झाली याची माहिती प्रत्येक कारखानयाकडून घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली तरच हा तिढा सुटेल असे एस.एम.देशमुख यांनी स्पष्ट केले आहे. २६५ जातीचा ऊस शेतकरयांसाठी किफायतशीर आहे, अन शेतकरयांनी आपल्या शेतात कुठला ऊस लावला पाहिजे हे त्याला ठरवू द्या, कारखाने शेतकरयांना खड्ड्यात घालून स्वता:च्या लाभ – तोट्याचा विचार करणार असतील तर ते सर्वथा गैर आहे.. साखर आयुक्तांनी यावर तातडीने निर्णय घ्यावा कारण आता ऊस लागवड आणि तोडीचा हंगाम जोरात सुरू आहे असेही देशमुख यांनी पत्रात नमूद केले आहे.

## आई हे संस्काराचे सर्वात मोठे विद्यापीठ -हभप राधाताई महाराज

बीड । प्रतिनिधी

आई हे जगातील सर्वात मोठे विद्यापीठ आहे. आई-वडिलांचे सेवा हा खरा परमार्थ आहे. सन्मार्ग दाखवण्याचे कार्य आई वडील करतात. आई संस्कार राज्य विद्यापीठ आहे. सन्मानमुळे वागल्यास जीवनाचे सोने होते, असे प्रतिपादन महासांगवी येथील संत मीराबाई संस्थांनच्या मठाधिपती ह.भ.प. राधाताई महाराज सानप यांनी केले. शिरूर (का.) तालुक्यातील तागडगाव येथील सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक अरुण डोंगरे यांच्या मातोश्री देवकाबाई अंकुशराव डोंगरे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त बुधवार दि.१९ रोजी आयोजित कीर्तनात ह.भ.प. राधाताई महाराज बोलत होत्या.



धन्य महाराज जन्मले संसारी, जे ध्याते अंतरी नारायण या अभंगावर राधाताई महाराज यांनी विद्वत्तापूर्ण निरूपण केले. कीर्तनात बोलताना कीर्तनात बोलताना ह भ.प. राधाताई महाराज म्हणाल्या, जीवन म्हटले की जन्ममृत्यू अटल आहे.. मरणाला घाबरू नका. चांगले जीवन जगावे. पती पत्नीने एकमेकाचा सन्मान करावा. मुलीच्या जन्माचा सन्मान करा मुलींना जपा मुली हिरा आहेत. अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा मोठा गुन्हेगार आहे गुन्हेगाराला शिक्षा झाली पाहिजे. सामाजिक दूषित वातावरण बदलण्यासाठी चांगल्या माणसाने पुढे येण्याची गरज आहे. रक्त, रक्ताशी प्रामाणिक राहते तेव्हा रामायण घडतं. असे सांगून आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा असाही हितोपदेश त्यांनी केला.

या कीर्तनंतर तागडगाव येथील श्री संत भगवान बाबा संस्था चे मठाधिपती ह.भ.प.अतुल महाराज शास्त्री यांनी, स्व. देवकाबाई डोंगरे यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांनी जीवनभर परमार्थिक आणि परोपकारी जीवन जगण्याचे सांगितले. यावेळी अरुण डोंगरे यांनी आपल्या आई विषयी भावनिक होऊन बोलताना, पत्नी आणि भावजय यांनी खूप सेवा केली, आईमुळे आपण घडली असे सांगितले. यावेळी उपस्थित सर्वांचे त्यांनी ऋण व्यक्त केले. कीर्तन कार्यक्रमास गायनाचार्य सांगळे महाराज, मृदंगाचार्य सुमित महाराज व संत मीराबाई संस्थान च्या वारकरी शिक्षण संस्थेतील २० विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या. वर्ष श्राद्धाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास सरपंच नवनाथ सानप, उपसरपंच प्रभाकर सानप, राजेंद्र मोराळे, बाबासाहेब सानप, डॉ.पालवे, नारायण नागरे, जायभाय, सानप, डॉ. सुधाकर आंधळे, वनवे मामा यांच्यासह मित्र परिवार, नातेवाईक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### कापसाच्या शेतात

सदर ईसमास छापा कारवाईची माहीती मिळताच तो फरार झाला. आरोपी नामे युवराज अण्णा आंधळेरा. हेळंब ता.परळी जि.बीड याचे विरुध्द पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे पोउपनि अंकुश निमोणे यांनी सरकारतर्फे फिर्याद देवुन गुन्हा नोंद केला आहे. याबाबत नागरीकांना अधिक माहीती असल्यास त्यांनी एन.डी.पी.एस सेल मो.क्र.८८८८८२४१०० वर संपर्क करुन माहीती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सदरची कामगिरी ही पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक, श्रीमती. चेतना तिडके , उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई, व्यंकटराम, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पो.नि सय्यद, पोउपनि महेश विघ्ने, अंकुश निमोणे, रियाज शेख, पोहवा केकाण, जोगदंड, पोना भताने, पोशि अंधळे, घोडके चापोहवा मराडे यांनी केली आहे.

### आम आदमी पार्टी

आम आदमी पार्टीची ताकद म्हणजे जनतेचा विश्वास व प्रामाणिक लढा. सत्तेच्या लालसेपोटी सुरू असलेल्या राजकीय डावपेचांपुढे आमचे उमेदवार खंबीरपणे उभे आहेत. जनतेसमोर दिलेल्या पर्यायामुळे प्रस्थापितांची झोप उडाली आहे. नागरिकांनी दिलेल्या पाठिंब्यावर आम आदमी पार्टी पूर्णपणे सक्षम आहे. बीड शहरातील प्रत्येक मतदारामध्ये आज बदलाची तीव्र इच्छा आहे, आणि आम आदमी पार्टी हा बदल आणणार आहे.

### आपला नगरसेवक आपणच

बीड नगराध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन आघाडीच्या सारिका जोगदंड, प्रभाग क्रमांक १४ मधील नवनाथ प्रभाकर सरवदे व प्रियंका लहू काळे, तर प्रभाग क्रमांक ४ मधील प्रफुल्ल बचुटे आणि किरण संदीप जाधव या उमेदवारांना मतदान करून ''स्वतः सत्तेत बसा'', असे आवाहन सुजात आंबेडकर यांनी केले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सुजात आंबेडकरांसमोर बीड नगरपालिकेची दयनीय स्थिती उघड केली. ''महिला-पुरुषांना प्राथमिक शौचालयाचीही व्यवस्था नगरपालिकेकडे नाही'', अशी तीव्र टीका त्यांनी केली. सभेला सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे, बीड पश्चिम जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सम्यकचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, माथाडी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आकाश जावळे, युवक जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर, शहराध्यक्ष लखन जोगदंड यांच्यासह जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सारिका ताई विकास जोगदंड यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### पाटोदा तालुक्यात

कारवाई हवी!

अंगणवाडीतील निष्काळजीपणा, गैरव्यवहार, भ्रष्टाचार यावर सखोल चौकशी करून जबाबदार महिला अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी पालकांनी जोरदारपणे केली आहे.शासनाचे कोट्यवधी रुपये वाया जात आहेत; आणि त्याचा भार मात्र आपल्या मुलांच्या भविष्यावर पडतो, असे पालकांचे मत आहे.

### लोक विकास महाआघाडीचे

महाआघाडी ज्यांच्या नेतृत्वात उभी आहे. ते राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाईचे नागरीकांसाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या पुर्ण करण्यासाठी समाजवादी पार्टी लोक विकास महाआघाडीस जाहीर पाठींबा देत आहे. १) अंबाजोगाई जिल्हा निर्मातीचा प्रश्न, २) बुट्टेनाथ तलावास मान्यता घेणे., ३) काळवटी साठवण तलावाची उंची वाढवणे, ४) बुट्टेनाथ परिसरामध्ये हजारो एकर जमीन डोंगराळ आहे. या ठिकाणी आनेक पर्यटक येतात. या ठिकाणाला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात यावा., ५) स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सर्वांत मोठी ओ.पी.डी असणारा दवाखाना आहे. औषधांसाठी लागणारा निधी व तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणुक व स्टाफ कमी प्रमाणात असल्यामुळे सदरचा स्टाफ वाढवणे व रूग्णांना त्याचा फायदा कसा देता येईल.

### मालेगाव चिमुरडीवरील

गुन्हे दाखल करावेत, पीडित कुटुंबाला संरक्षण व आर्थिक मदत द्यावी, महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर शासनाने कठोर भूमिका घ्यावी, हे निवेदन बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले.

## शांतिब्रह्म संत रामहरी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाला सुरुवात

बीड । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायातील महान संत बंकट स्वामी महाराज यांच्या परंपरेतील शांतिब्रम्ह संत रामहरी महाराज यांच्या नवव्या पुण्यतिथी उत्सवाला मोठा थाटात सुरुवात झाली..श्री ह भ प गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प विष्णुपंत महाराज लोंढे गुरुजी, रणजीत महाराज शिंदे व विश्वस्त मंडळी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन, ग्रंथपूजन ,टाळ मृदंग पूजनाने सुरुवात झाली. सात दिवस या ठिकाणी अखंड हरिनाम, किर्तन प्रवचन संगीत भजन आदी कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.. या कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संत बंकट स्वामी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र वानगाव येथे संत बंकट स्वामी महाराज वारकरी परंपरेतील ओजस्वी तेजस्वी अष्टपैलू संत वै. शांतीब्रह्म रामहरी महाराज यांच्या नवव्या पुण्यतिथी



उत्सवाला मोठ्या थाटात सुरुवात करण्यात आली.संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान वानगाव

गु.रामहरी बाबा सुसंस्कार आश्रम वानगाव फाटा ता. जि.बीड येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार यांचे कीर्तन होणार आहेत. पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प विष्णु महाराज जगताप, दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प शांती ब्रह्म महादेव महाराज चाकरवाडीकर, तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प गोरख महाराज कुदळकर, चौथा दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली करंजीकर, पाचव्या दिवसाचे संभाजी महाराज नारायण गडकर, सहाव्या दिवसाचे कीर्तन पुष्प केशव महाराज चावरे, सातव्या दिवसाचे कीर्तन पुष्प रवींद्र महाराज हरणे, काल्याचे किर्तन श्री ह भ प महान लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे होणार आहे. या सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## युवकांनी बेरोजगारीच्या प्रश्नावर तीव्र लढा उभा करावा-डॉ. अजित नवले

माजलगाव । प्रतिनिधी

डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया(डी वाय एफ आय) चे तीन दिवसीय महाराष्ट्र राज्य अधिवेशनाला दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी माजलगाव शहरात भव्य रॅली काढून सर्वांना शिक्षण सर्वांना काम मिळालंच पाहिजे.. युवा एकता जिंदाबाद अशा जोरदार घोषणांनी सुरुवात झाली.



यानंतर डी वाय एफ आय राज्याध्यक्ष नंदू हाडळ यांच्या अध्यक्षतेखाली रॅलीचे रूपांतर जाहीर सभेत झाले. या सभेला संबोधित करण्यासाठी अधिवेशनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड, प्रमुख उपस्थिती डीवायएफआय चे राष्ट्रीय सचिव हेमंगराज भट्टाचार्य, त्याचबरोबर प्रमुख वक्ते म्हणून किसान सभेचे महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी उपस्थित राज्य भरातून आलेल्या प्रतिनिधींना युवकांच्या समोरील आव्हाने व त्यावर युवा संघटनेची वाटचाल या विषयी संबोधित केले. जाहीर सभेचे प्रास्ताविक राज्य उपाध्यक्ष मोहन जाधव यांनी तर सूत्रसंचालन राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी केले.

पुढील तीन दिवस डि वाय पि एफ ने मागील तीन वर्षांत केलेल्या कामांची चर्चा केली जाईल, पुढील लढ्याची दिशा ठरवली जाईल त्याच प्रमाणे पुढील काळासाठीची नवीन राज्य समिती लोकशाही पद्धतीने निवडली जाईल अशी माहिती डि.वाय.पी.चे राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी दिली.

# अंबाजोगाईत ४१ व्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणार्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे यावर्षी ४१ वे वर्ष असून तीन दिवसीय कार्यक्रमात उद्घाटन समारंभ, कवी संमेलन, सुगम संगीत, शालेय चित्रकल व बाल आनंद.मेळावा, शेतकरी परिषद, शास्त्रीय संगीत कार्यक्रम, यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार वितरण, समारोप समारंभ असा संपन्न होणार आहे.

अंबाजोगाईत गेल्या ४० वर्षांपासून सातत्याने यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने वैविध्यपुर्ण, वैचारिक, वाङ्मयीन, सांगितीक, सांस्कृतिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार, कृषिविषयक प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा व प्रदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन असे विविध कार्यकम आयोजित केले जातात. अंबाजोगाई व मराठवाड्याचा सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक, वैचारिक वारसा जोपासण्याचा व दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो. यावर्षी ४१ वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह दि.२५, २६ व २७ नोव्हेंबर मंगळवार, बुधवार व गुरुवार असा संपन्न होणार आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली.

उद्घाटन व कवी संमेलन

मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५. ३० वा. या समारोहाचे उद्घाटन नांदेड येथील साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध लेखक श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. रात्रौ ८.३० वा. कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून अध्यक्षस्थानी नांदेड येथील येथील ज्येष्ठ कवी प्रा.डॉ. पी. विठ्ठल हे राहणार असून, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन घाटनांदूर येथील सुप्रसिद्ध कवी अविनाश भारती करणार आहेत. तर सुप्रसिध्द कवी सर्वश्री शरद धनगर-अमळनेर, पुनीत मातकर- यवतमाळ, अनंत राऊत-अकोला, डी.की. शेख- धाराशिव, लता ऐवळे कदम- सांगली, अविनाश काठवटे- छत्रपती संभाजीनगर, गुंजन पाटील- सोयगाव, गजानन मते-अमरावती, सुनील उन्हाळे-छत्रपती संभाजीनगर , सय्यद चांद तरोडकर-परभणी व आत्माराम जाधव-गंगाखेड यांचा सहभाग राहणार आहे.

बुधवार, दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता ८ वी ते १० वी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे. सकाळी १०. ३० वाजता बाळ आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून त्यातच चित्रकला स्पर्धा विजेत्यांना बक्षीस वितरण केले जाईल. सुप्रसिद्ध साहित्यिक विठ्ठल जाधव-शिरूर कासार हे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून अंबाजोगाई येथील प्रसिद्ध चित्रकार त्र्यंबक पोखरकर हे पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.सोबतीचा करार सायंकाळी ८ वाजता पुणे येथील सुप्रसिद्ध कवी वैभव जोशी यांच्या कविता व गझलेवर आधारित सोबतीचा करार या संगीत मैफिल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.असून यात दत्तप्रसाद रानडे गायन करतील तर त्यांना सिंथसायजेर व सहगायन निनाद सोलापूरकर, तबला समीर शिवगार, ढोलक आमोद कुलकर्णी हे साथ करतील. या सर्व रचनांचे संगीतकार आशिष मुजुमदार यांनी संगीत दिले असून तेही साथ करणार आहेत.गुरुवार दिनांक २७ नोव्हेंबर २९२५ रोजी सकाळी १०.३० वाजता शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले असून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण हे यशवंतराव चव्हाण यांचे कृषी-औद्योगिक धोरण आणि वर्तमान शेती यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी केळसांगवी ता. आष्टी येथील प्रयोगशील महिला शेतकरी श्रीमती विजया गंगाधर घुले या असणार आहेत. त्यांनी शेतीत केलेले प्रयोग व देशी विदेशी फळबाग व उत्पादन याविषयी अनुभव सांगणार आहेत.

समारोप समारंभ व पुरस्कार वितरण

सायंकाळी ५.३० वाजता या समारोहाचा समारोप समारंभ होत असून अध्यक्षस्थानी अमरावती येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व शिक्षण तज्ज्ञ डॉ. कमलताई रामकृष्ण गवई ह्या उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्काराचे मानकरी श्रीमती विजया गंगाधर घुले-केळसांगवी ता.आष्टी यांना कृषी, केशव वसेकर-परभणी यांना साहित्य, पं. मुकेश जाधव-पुणे यांना संगीत व कळमअंबा ता. केज येथील विश्वविजेत्या भारतीय महिला खो खो संघाची कर्णधार कु. प्रियंका हनुमंत इंगळे हिला क्रीडा युवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पहार, रोख पाच हजार रुपये असे आहे. याच समारंभात यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे मार्गदर्शक रसिकाग्रणी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भगवानराव शिंदे बप्पा यांचा विशेष सन्मान कमलताई गवई यांच्या हस्ते करण्यात येईल.

शास्त्रीय संगीत संभा

समारोप समारंभानंतर रात्री ८ .३० वाजता शास्त्रीय संगीत सभेचे आयोजन करण्यात आले असून यात जगप्रसिद्ध तबलावादक पं. मुकेश जाधव यांचे तबला सोलो वादन होईल त्यांना संवादिनीवर अभिषेक शिनकर साथ करतील. त्यानंतर आघाडीचे आंतरराष्ट्रीय शास्त्रीय गायक कृष्णा बोंगाणे यांचे गायन होईल. त्यांना तबल्यावर आशय कुलकर्णी व संवादिनीवर अभिषेक शिनकर हे साथसंगत करतील.

ग्रंथ प्रदर्शने व कला दालने

दर वर्षी प्रमाणे या तिन्ही दिवशी ग्रंथ विक्री व प्रदर्शन, चित्रकला, हस्तकला प्रदर्शने भरवली जाणार आहेत. हे सर्व कार्यक्रम वेणूताई चव्हाण महिला महाविद्यालय अंबाजोगाई येथे पार पडतील. सर्व नागरिक, विद्यार्थी, रसिकांनी या समारंभास उपस्थित रहावे असे आवाहन समितीचे सचिव दगडू लोमटे, इतर पदाधिकारी डॉ. कमलाकर कांबळे, सतीश लोमटे, प्रा. सुधीर वैद्य, डॉ .प्रकाश प्रयाग, प्रा. भगवान शिंदे, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, त्र्यंबक.पोखरकर, मार्गदर्शक भगवानराव शिंदे व राजपाल लोमटे यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती ए. बी. निवारे १० वे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, बीड यांच्या न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज १७५८/२०२५

मार्फत:ॲड.राजेश बी. शिंदे

गोरख व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १) गोरख पि. सोपान सोनवणे, वय ६० वर्ष, धंदा मजुरी, रा.वरवटी, ता. जि. बीड २) अशोक पि. गोरक्षनाथ उर्फ गोरख सोनवणे, वय ४० वर्ष, धंदा मजुरी, रा. वरवटी ता. जि. बीड. ३) मिरा भ्र. माणिक वाघमारे, वय ३७ वर्ष, धंदा घरकाम, रा. घोसापुरी ता. जि. बीड ४) गौतम पि. गोरख सोनवणे, वय ३४ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरवटी ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

मागणी अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कमल गोरख सोनवणे, रा. वरवटी ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत कमल गोरख सोनवणे, रा. वरवटी ता. जि. बीड यांचा मृत्यु दि. ०३/१०/२०१७ रोजी वरवटी ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार १ हे मयताचा पती असून अर्जदार क्र. २ व ४ हे मयताचे मुले आहेत तसेंच अर्जदार क्र. ३ ही मयताची मुलगी आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर म

सदराहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कमल गोरख सोनवणे, रा. वरवटी ता. जि. बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २० माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३ डिसेंबर २०२५

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.**

**स्वाक्षरीत**
**क. लिपीक**

# कृषी विद्यापीठांनी नैसर्गिक शेती अभ्यास करावा

## नैसर्गिक शेती परिषदेत अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांचे आवाहन

पुणे : कृषी विद्यापीठांनी गुजरात, हरियानातील नैसर्गिक शेती धोरणाचा अभ्यास सुरू करावा, असे आवाहन अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी केले. पुणे कृषी महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'नैसर्गिक शेती परिषदे'च्या समारोप सत्रात ते बोलत होते.

आनंद कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. कथारिया, दांतिवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राघवेंद्रसिंह चौहान, गुजरात प्राकृतिक विकास बोर्डाचे कार्यकारी संचालक सी. एम. पटेल, गुजरात कृषी विभागाच्या आत्माचे संचालक संतोष जोशी यांनी कृषिशास्त्रज्ञांशी या वेळी संवाद साधला.

रस्तोगी म्हणाले, ''नैसर्गिक शेतीमधील नवतंत्राची सुरुवात लहान स्तरावर सुरू करावी. त्यासाठी गुजरात व हरियानातील संशोधन व उपक्रमांची माहिती पाचही विद्यापीठांच्या शास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष भेटीद्वारे घ्यावी. तसेच, कृषी विज्ञान केंद्रांमध्ये नैसर्गिक शेतीची प्रक्षेत्रे सुरू करावीत.



यामुळे शेतकऱ्यांना पद्धत समजणे सोपे जाईल.'' नैसर्गिक शेतीस उपयुक्त बियाण्यांची निर्मिती गरजेची आहे. त्यासाठी महाबीजसमवेत उपक्रम राबवावेत. या तंत्रात देशी गायीचे शेण व गोमूत्र महत्त्वाचे मानले गेले आहे. त्यामुळे गोधनाचा वापर वाढविण्यासाठी आत्मा संचालक व पशुसंवर्धन विभागाने एकत्रित नियोजन करावे. शेतकऱ्यांना 'महाविस्तार' ॲपवर तसेच 'चॅटबॉट'वर माहिती दिली जावी, असेही श्री.रस्तोगी यांनी सूचित केले. या एकदिवसीय परिषदेचे नियोजन व आभार प्रदर्शन पुणे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दयानंद माने यांनी केले.

### 'विद्यापीठांनी सायनिक शेतीची डायरी बदलावी'

नैसर्गिक शेतीसाठी शेतकऱ्यांना नेमक्या लागवड पद्धती (पॅकेज ऑफ प्रॅक्टिसेस) आधी सांगाव्या लागतील. कृषी विद्यापीठांच्या सध्याच्या सर्व पद्धती केवळ रासायनिक शेतीचीच माहिती देतात. त्यामुळे आधी विद्यापाठांनी त्यांची रासायनिक शेतीची डायरी बदलावी. यात नैसर्गिक शेतीचीदेखील माहिती असावी, अशा सूचना श्री.रस्तोगी यांनी केल्या.

# जमिनीच्या वाटणीपत्रास मिळणार आता कायदेशीर आधार

## भूमिअभिलेख विभागाने घेतला महत्वपूर्ण निर्णय

पुणे : शेतकरी कुटुंबातील वडिलोपार्जित जमिनीच्या हिश्श्याची करण्यासाठी आता प्रत्येक पोटहिश्श्यासाठी केवळ दोनशे रुपये शुल्क आकारले जाणार आहे. या निर्णयामुळे नोंदणीकृत वाटणीपत्राच्या आधारे जमिनीचे विभाजन करून घेणाऱ्या शेतकऱ्यांचा जमीन मोजणीसाठी लागणारा मोठा आर्थिक भार कमी होणार आहे.

भूमिअभिलेख विभागाने शेतकऱ्यांसाठी हा एक महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. यापूर्वी वडिलोपार्जित जमिनीच्या मोजणीसाठी प्रतिहिस्सा एक ते १४ हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जात होते. ज्यामुळे शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक ताण पडत होता. भूमिअभिलेख विभागाने आता यात बदल करून प्रतिपोटहिस्सा केवळ २०० रुपये शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना राज्यभर लागू करण्यात आली आहे. तसे पत्र जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे यांनी काढले आहे. भूमिअभिलेख विभागाच्या महाभूमिअभिलेख या संकेतस्थळावर एकत्र कुटुंब पोटहिस्सा मोजणी यात त्याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच ई-मोजणी व्हर्जन २.० या संगणक प्रणालीतही त्याचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे जमिनीच्या मालकी हक्काबाबत स्पष्टता येण्यास मदत होणार आहे. तसेच पोटहिस्सा मोजणीची प्रक्रिया सुलभ आणि स्वस्त होणार आहे. कुटुंबांतर्गत जमिनीच्या वाटणीच्या वादावर निर्माण होणारे वाद मिटण्यासही यामुळे मदत होईल. अनेकदा वडिलोपार्जित जमिनीचे कागदोपत्री वाटप केले जाते, त्याला कायदेशीर आधार प्राप्त होत नाहीत. भविष्यात त्यावरून वाद सुरू होतात. ते कमी करण्यासाठी हा निर्णय लागू करण्यात आला आहे.



# पिकांसाठी सल्फरच्या वापराचे फायदे

राज्यातील शेतकरी शेती करताना आपल्या पिकांना विविध प्रकारची रासायनिक खते वापरत असतात. या सर्वांमध्ये युरिया हे खत सर्वात खपाचे खत म्हणून ओळखले जाते. अलीकडेच केंद्र सरकारने शेतीसाठी सल्फर कोटेड युरियाचा वापर करण्याचे धोरण अवलंबले आहे. मात्र आता पिकांसाठी सुलफर इतके महत्वाचे का आहे? सल्फरच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नेमके काय नुकसान होऊ शकते? असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होत असतात.



उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घसरण :

कृषी संशोधकांच्या एका अहवालानुसार, पिकांना किंवा झाडांना सल्फरची कमतरता जाणवल्यास त्यांची वाढ खुंटते तसेच उत्पादनात घट दिसून येते. सल्फरच्या कमतरतेमुळे तेलबिया पिकांच्या गुणवत्तेमध्ये आणि उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घसरण होते. सल्फरची कमतरता शेती करताना मोठी समस्या असते. मात्र, शेतीमध्ये पिके घेताना शेतकऱ्यांच्या ही बाब लक्षात येत नाही.

तेलबिया पिकांसाठी महत्वाचे : भारतातील जवळपास ४१ टक्क्यांहून अधिक जमिनीत सल्फरची कमतरता आढळून येते. भारतीय तेलबिया पिकांमध्ये सोयाबीन, मोहरी, भुईमूग, तीळ हे प्रमुख तेलबिया पिके आहेत. या पिकांसाठी संतुलित खतांचा वापर आवश्यक आहे. या खतांमध्ये प्रामुख्याने नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, सल्फर, जस्त आणि बोरॉन ही खते आवश्यक असतात. यात तेलबिया पिकांच्या उत्पादनासाठी सल्फर हे खूप महत्वाचे खत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तेलबिया पिके घेताना आपल्या जमिनीमध्ये सल्फरची कमतरता आढळून आल्यास त्याचा पिकांसाठी नक्की वापर करावा.

हरितलवकांच्या वाढीस मदत : सल्फर हा पिकांना हरितलवकांच्या चांगल्या वाढीस मदत करतो. सल्फर हे खत अमीनो ॲसिड, सिस्टीन, सिस्टिन आणि मेथिओनिन आणि प्रथिने संश्लेषणासाठी पिकांसाठी आवश्यक असते. मोहरी पिकाच्या विशिष्ट वासावर त्याचा परिणाम होतो.

तेलबिया पिकांच्या पोषणामध्ये सल्फरचे विशेष महत्त्व असून, पिकांच्या वाढीच्या अवस्थेत पिकांच्या बिया टपोऱ्या होण्याच्या अवस्थेत अर्थात तेल तयार होण्याच्या प्रक्रियेत सल्फर हा घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे तेलबिया पिकांमध्ये तेलकट पदार्थाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

पिकांना सल्फर कधी द्यावे? : पिकांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी सल्फर फायदेशीर आहे. त्यामुळे सिंचनाच्या वेळी तेलबिया पिकांना ५ किलो प्रति बिघा या प्रमाणात सल्फर वापरावे. बेंटोनाइट सल्फरचा वापर फायदेशीर आहे. याशिवाय ८ ते १० किलो सल्फरची धूळ प्रति एकर फवारली जाऊ शकते किंवा ओले किंवा विरघळणारे सल्फरचे द्रावण तीन ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारले जाऊ शकते. सुरवंटाचा प्रादुर्भाव आढळल्यास सल्फरची फवारणी करताना ब्युव्हेरिया बेसियाना ४०० मिली प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून वापरावे.

# सेंद्रिय हळद लागवड आणि प्रक्रिया

सेंद्रिय शेती संशोधन संस्था यांच्या २०२१ मधील सर्वेक्षणानुसार, सेंद्रिय शेती करणाऱ्या १८७ देशांमध्ये भारताचे स्थान अद्वितीय आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा हळद उत्पादक देश असून सुमारे ८०% हळद उत्पादन भारतात होते, तर १५ ते २० टक्के हळद निर्यात केली जाते. देशातील एकूण सेंद्रिय शेतीपैकी हळदीचे सेंद्रिय लागवड क्षेत्र सुमारे १.३ लाख हेक्टर असून, यामध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, ओडिशा, तामिळनाडु आणि उत्तर-पूर्व राज्यांचा मोठा वाटा आहे. जम्मू-काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हळदीची लागवड होऊ शकते. विशेषतः महाराष्ट्रातील हवामान हळद लागवडीस अत्यंत पोषक आहे. राज्यातील हळद उत्पादन प्रामुख्याने सातारा, चंद्रपूर, सांगली, उस्मानाबाद, लातूर, जळगाव, नांदेड, नागपूर, हिंगोली, कोल्हापूर आणि परभणी जिल्ह्यांत होते

सेंद्रिय हळद प्रक्रिया : सेंद्रिय हळद प्रक्रिया म्हणजे रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर न करता नैसर्गिक पद्धतीने हळदीचे उत्पादन आणि प्रक्रिया करणे. या प्रक्रियेमुळे हळदीतील नैसर्गिक औषधी घटक, विशेषतः कुर्कुमीन, टिकून राहतो आणि परिणामी हळद अधिक आरोग्यदायी व गुणकारी बनते. सेंद्रिय हळद उत्पादनाची प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि नैसर्गिक पद्धतींनी केली जाते. सुरुवातीला, हळदीसाठी योग्य जमिन निवडली जाते, जी नैसर्गिकरित्या सुपीक आणि सेंद्रिय घटकांनी समृद्ध असते. गाईच्या शेणापासून बनवलेले सेंद्रिय खत, कंपोस्ट, हिरवळीची खतं आणि जैविक कीडनाशकांचा वापर करून पूर्वतयारी केली जाते. यानंतर, हळदीच्या गुणवत्तापूर्ण जातींची निवड करून बियाणे प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेत रासायनिक बुरशीनाशकांऐवजी नैसर्गिक बुरशीनाशकांचा वापर केला जातो, ज्यामुळे पीक निरोगी राहते आणि पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होत नाही.

हळदीची लागवड आणि वाढ : हळदीची लागवड प्रामुख्याने खरीप हंगामात केली जाते. प्रामुख्याने हळद उन्हाळ्याच्या शेवटी किंवा पावसाळ्याच्या सुरुवातीस (मे-जून) लावली जाते.



सेंद्रिय पद्धतीने लागवडीसाठी मुख्यतः गादीवाफे तंत्राचा वापर केला जातो. गादीवाफे म्हणजे सैल, सेंद्रिय घटकयुक्त, १ मीटर रुंदीचे आणि योग्य उंचीचे बेड तयार करून लागवड करण्याची पद्धत आहे, ज्यामुळे पाणी निचरा सुधारतो आणि मुळांचा चांगला विकास होतो.

हवामान आणि मातीची आवश्यकता : हळदीची लागवड समुद्रसपाटीपासून १५०० मीटर उंचीपर्यंत विविध उष्णकटिबंधीय परिस्थितीत, २०-३५ अंश सेल्सिअस तापमानात आणि वार्षिक १५०० मिमी किंवा त्याहून अधिक पाऊस पडतो, पावसावर अवलंबून किंवा सिंचनाखाली करता येते. जरी ते वेगवेगळ्या प्रकारच्या मातीत घेतले जाऊ शकते, तरी ते चांगल्या निचऱ्याच्या वाळू किंवा चिकणमाती मातीत चांगले वाढते ज्यांचे पीएच श्रेणी ४.५-७.५ असते आणि चांगल्या सेंद्रिय स्थितीचे असते.

जमीन तयार करणे : पावसाच्या सुरुवातीच्या पावसाने जमीन तयार केली जाते. सुमारे चार खोल नांगरट्यांनी माती चांगली मशागत केली जाते. लॅटराइट मातीसाठी मातीच्या पीएचनुसार ५००-१००० किलो/हेक्टर या प्रमाणात हायड्रेटेड चुना टाकावा लागतो आणि पूर्णपणे नांगरून घ्यावा लागतो. जमिनीत आम्लता अधिक असल्यास पीएच संतुलित करण्यासाठी हायड्रेटेड चुना वापरला जातो. मान्सूनपूर्व पाऊस पडताच, १० मीटर रुंदीचे, ३० सेमी उंचीचे आणि सोयीस्कर लांबीचे गादीवाफे तयार केले जातात दोन ओळीतील अंतर ३०-४५ सेमी आणि दोन रोपांमधील अंतर १५-२० सेमी ठेवले जाते. लागवड देखील कडा आणि सरी तयार करून केली जाते.

प्रसार आणि लागवड : लागवडीसाठी संपूर्ण किंवा तुकडे केलेले मातृकंद (मदर राईझोम) आणि बोटासारखे कंद वापरले जातात. शक्यतो, चांगली वाढ झालेली, निरोगी आणि रोगमुक्त कंदमुळे निवडावीत. सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक बुरशीनाशकांऐवजी ट्रायकोडर्मा, गोमूत्र किंवा दशपर्णी अर्क यांसारख्या सेंद्रिय बुरशीनाशकांनी कंदमुळे प्रक्रिया करणे फायदेशीर ठरते. प्रक्रिया केलेले कंद सावलीत ३-४ तास वाळवून लागवड करावी. एक हेक्टर क्षेत्रासाठी साधारणतः २,५०० किलो कंदमुळांची बियाणे म्हणून आवश्यकता असते.

खत आणि आच्छादन : शेतखत किंवा कंपोस्ट हे ३० ते ४० टन प्रति हेक्टर या प्रमाणात, जमीन तयार करताना किंवा लागवडीच्या वेळी गादीवाफ्यावर किंवा खड्ड्यांत बेसल ड्रेसिंग म्हणून मिसळले जाते. तसेच, केक (जसे की निंबोळी पेंड किंवा तीळ पेंड) यासारखी सेंद्रिय खते २ टन प्रति हेक्टर या दराने वापरता येतात. अशा वेळी शेणखताचे प्रमाण थोडे कमी करता येते. लागवडीनंतर लगेचच, हिरव्या पानांचे (जसे की गवत, मक्याचे पाने इ.) आच्छादन सुमारे १२ ते १५ टन प्रति हेक्टर या प्रमाणात करणे गरजेचे असते, जेणेकरून मातीतील ओलावा टिकून राहील आणि तणांचा प्रादुर्भाव कमी होईल. यानंतर, लागवडीनंतर ४० व ९० दिवसांनी तणनियंत्रण आणि माती चढवण्याच्या प्रक्रियेनंतर, आच्छादनाची पुनरावृत्ती ७.५ टन प्रति हेक्टर या प्रमाणात केली जाते. हळदीची काढणी : सेंद्रिय हळदीची काढणी योग्य वेळी आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे अत्यंत महत्त्वाचे असते. चांगल्या पद्धतीने व्यवस्थापित केलेले हळदीचे पीक पेरणीच्या प्रकारानुसार आणि वेळेनुसार सात ते नऊ महिन्यांत काढणीसाठी तयार होते. साधारणपणे जानेवारी ते मार्च दरम्यान हळदीची काढणी केली जाते. परिपक्व झाल्यावर, पाने सुकतात आणि हलक्या तपकिरी ते पिवळ्या रंगाची होतात. जेव्हा हळदीची पाने वाळून पिवळी पडतात, तेव्हा ती उपटून बाहेर काढली जाते. हळदीचे कंद व्यवस्थित काळजीपूर्वक काढले जातात. हळदीची काढणी अथवा खोदणी करताना चुकून कंदांना इजा झाली तर त्याचा हळदीच्या प्रतीवर आणि विक्रीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

हळद प्रक्रिया : ताजी हळद काढणीनंतर हळकुंडे स्वच्छ पाण्याने दोन ते तीन वेळा धुवून माती आणि मुळांपासून स्वच्छ केली जातात. पारंपरिक पद्धतीमध्ये ओल्या हळदीचे कंद शिजवून वाळवले जातात, मात्र काही सेंद्रिय प्रक्रिया करणारे शेतकरी उकळण्याऐवजी नैसर्गिक वाळवणीला प्राधान्य देतात. हळदीचे कंद शिजवण्याची पद्धत वगळून सेंद्रिय हळद प्रक्रिया ही हळदीच्या उत्पादनाची एक पर्यायी आणि नैसर्गिक पद्धत आहे, जी विशेषतः सेंद्रिय शेतकरी किंवा कमी प्रमाणात प्रक्रिया करणाऱ्या शेतकरी समूहांसाठी उपयुक्त आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८९ : न्यूजर्सी अमेरिकेचे पहिले राज्य बनले.
१८६६ : आजच्याच दिवशी अमेरिकेतील वाशिंगटन या शहरात हावर्ड या जागतिक विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती.
१८७७ : थॉमस अल्वा एडिसन यांनो ग्रामोफोन चा शोध लावला.
१९१७ : युक्रेन प्रजासत्ताक बनले.
१९१७ : कलकत्ता या शहरी आजच्याच दिवशी बोस या संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली होती.
१९४५ : न्युरेम्बर्ग ट्रायल्स दुसऱ्या महायुद्धातील गुन्ह्यांसाठी २४ जणांवर खटला सुरू झाला.
१९५५ : पौली उम्रीगर या भारतीय क्रिकेट पटू ने आजच्याच दिवशी न्यूझीलंड विरुध्द कसोटी खेळात द्विशतक झळकावले होते.
१९५९ : युनायटेड नेशन्सने बालहक्कांच्या घोषणापत्राची दखल घेतली.
१९६८ : अमेरिकेने आजच्याच दिवशी नेवाडा येथे अण्वस्त्र परीक्षण केले.
१९८१ : आफ्रिकेतील देश बुरुंडी ने आजच्याच दिवशी संविधानाचा स्वीकार केला होता.
१९८१ : आजच्याच दिवशी भारताच्या भास्कर या उपग्रहाला अंतराळात सोडण्यात आले होते.
१९८५ : मायक्रोसॉफ्ट विंडोज १.० प्रकाशीत झाले.
१९९४ : भारताची ऐश्वर्या राय 'मिस वर्ल्ड' किताबाची मानकरी बनली.
१९९७ : अमेरिकेच्या 'कोलंबिया' या अंतराळयानातून कल्पना चावला ही पहिली भारतीय महिला अंतराळयात्री आपल्या पहिल्या अवकाशमोहिमेवर रवाना झाली.
१९९८ : 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन'चे प्रक्षेपण झाले.
१९९९ : अनाथ आणि निराधार बालकांच्या संगोपनासाठी दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'हॅरी होल्ट पुरस्कार' लता जोशी यांना जाहीर.
१९९९ : आर.जी.जोशी फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा 'राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक मोरोपंत पिंगळे यांना जाहीर
२००८ : अमेरिकेतील आर्थिक संकटामुळे 'डाऊ जोन्स' निर्देशांक १९९७ पासुनच्या नीचांकी पातळीवर पोहोचला.
२०१६ : भारताची बैटमिन्टनपटूपी वी सिंधूहिने आजच्याच दिवशी चायना ओपन सुपर सिरीज अंतिम सामन्यामध्ये चीनच्या सून यु को हिचा पराजय करित पहिला सुपर सिरीज पुरस्कार आपल्या नावी केला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०२ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ ऑट्टो फोन ग्वेरिक यांचा जन्म.
१७५० : शहाबहादूर फतेह अली खान ऊर्फ टिपू सुलतान हैदरअलीचा थोरला मुलगा व मैसूरचा वाघ (मृत्यू: ४ मे १७९९)
१८५४ : कवी, निबंधकार व नाटकाकर मोरो गणेश लोंढे यांचा जन्म.
१८८९ : एडविन हबल - अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २८ सप्टेंबर १९५३)
१८९२ : इंसुलिन चे सहसंशोधक जेम्स कॉलिप यांचा जन्म. (मृत्यू: १९६५)
१९०५ : मिनोचर रुस्तुम तथा 'मिनू' मसानी संसदपटू, अर्थतज्ज्ञ, घटनापंडित व स्वतंत्रता पक्षाचे नेते (मृत्यू: २७ मे १९९८)
१९१० : डच भौतिकशास्त्र विलेम जेकब व्हान स्टॉकम यांचा जन्म.
१९२४ : फ्रेंच गणितज्ञ बेनुवा मँडेलब्रॉट यांचा जन्म.
१९२७ : चंद्रशेखर शंकर धर्माधिकारी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, वकील, लेखक, स्वातंत्र्यसैनिक, पद्मभूषण.
१९३९ : वसंत पोतदार - मराठी साहित्यिक (३० एप्रिल २००३ नाशिक)
१९४१ : उर्दू लेखिका हसीना मोईन यांचा जन्म.
१९६३ : इंग्लिश गणितज्ञ तिमोथी गॉवर्स यांचा जन्म.
१९६९ : अभिनेत्री शिल्पा शिरोडकर यांचा जन्म.
१९८९ : भारतीय महिला कुस्तीपटू बबिता फोगाट हिचा आजच्याच दिवशी जन्म झाला होता.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५९ : माऊंट स्ट्युअर्ट एल्फिस्टन - स्कॉटिश मुत्सद्दी, हिन्दुस्थानातील मुंबई प्रांताचे गवर्नर, कुशल प्रशासक व इतिहासकार. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले. त्यांनी हिस्ट्री ऑफ इंडिया' या दोन खंडात भारताचा इतिहास लिहिला. (जन्म: ६ आक्टोबर १७७९)
१८८४ : लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर फैज अहमद फैज यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी १९११)
१९०८ : बंगालमधील सुप्रसिद्ध क्रांतिकारक कन्हय्यालाल दत्त यांना फाशी.
१९१० : लिओ टॉलस्टॉय - रशियन लेखक (जन्म: ९ सप्टेंबर १८२८)
१९५४ : सेसेना एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनचे संस्थापक क्लाइड व्हर्नन सेसेना यांचे निधन. (जन्म: ५ डिसेंबर १८७९)
१९७० : यशवंत खुशाल देशपांडे - महानुभाव वाङ्मयाचे नामवंत संशोधक, १९३९ मधे झुरिच येथे झालेल्या जागतिक इतिहास परिषदेतील भारताचे प्रतिनिधी (जन्म: १४ जुलै १८८४)
१९७१ : स्पेन या देशाचा हुकुमशाह फ्रेंको याचे निधन झाले होते.
१९७३ : केशव सीताराम तथा प्रबोधनकार ठाकरे - पत्रकार, समाजसुधारक, लेखक, वक्ते व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एक प्रमुख कार्यकर्ते (जन्म: १७ सप्टेंबर १८८५)
१९८४ : फैज अहमद फैज - लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (जन्म: १३ फेब्रुवारी १९११)
१९८९ : 'गानहिरा' हिराबाई बडोदेकर - भारतीय संगीत क्षेत्रातील अध्वर्यू. 'पुण्यप्रभाव', 'सौभद्र', 'विद्याहरण', 'युगांतर' आदी नाटकांत त्यांनी नायिकेच्या भूमिका केल्या. नाटकांतील पदांच्या त्यांच्या ध्वनिमुद्रिका खूप गाजल्या. १९७० मधे त्यांना 'विष्णूदास भावे सुवर्णपदक' देण्यात आले. (जन्म: १९ मे १९०५ बडोदा)
१९९७ : शांताराम शिवराम तथा आचार्य बाळाराव सावरकर - स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांचे स्वीय सहाय्यक (कोणतेही नाते नव्हते), हिन्दू महासभेचे अध्यक्ष.
१९९८ : दत्तात्रेयशास्त्री तांबे गुरूजी - संस्कृतच्या विविध शास्त्रांतील पंडित, प्रख्यात मीमांसक.
१९९९ : दत्ता महाडिक पुणेकर - तमाशा कलावंत (सोंगाड्या).
२००३ : सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकचे पहिले राष्ट्राध्यक्ष डेव्हिड डेको यांचे निधन. (जन्म: २४ मार्च १९३०)
२०१४ : भारताची प्रसिध्द कवियत्री निर्मला ठाकूर यांचे आजच्या दिवशी निधन झाले होते.

# गतिरोधक नसल्याने शिवन्यात ४ दिवसाला एक अपघात

## चार वर्षांमध्ये १४ जणांचा मृत्यू, अजिंठा– बुलडाणा महामार्ग ग्रामस्थांसाठी ठरतोय घातक

अजिंठार। प्रतिनिधी

अजिंठा– बुलढाणा राज्य महामार्गावरील शिवना येथील जिल्हा परिषद शाळा ते संत धोंडिबा महाराज मंदिरापर्यंत गतिरोधक नसल्याने अपघात वाढले आहेत. येथे सध्या दर चार दिवसांआड अपघात होत असून गत चार वर्षांत झालेल्या अपघातांमध्ये ४५ किरकोळ, २७ गंभीर तर १४ जणांना जीव गमवावा लागला आहे.

असे असतानाही अद्याप प्रशासनाला जाग आली नसल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला आहे. दुभाजके फोडून दुचाकी वळण घेण्यासाठी जागोजागी रस्ते तयार झाल्याने, तसेच बेभान होऊन राँग साइडने सुसाट धावणारी वाहने अपघातास कारणीभूत ठरत आहेत. १३ नोव्हेंबर रोजी दोन दुचाकींच्या अपघातातील एक दुचाकी फुटबॉलसारखी उडाल्याने दोन जण गंभीर जखमी झाले होते. यातील आशा रमेश काळे या विवाहितेचा उपचारादरम्यान बुधवारी (१९ नोव्हेंबर) मृत्यू झाला. विदर्भ, खान्देश व मराठवाड्याच्या सीमा भेदून अलीकडेच



अजिंठा–बुलढाणा राज्य महामार्ग (क्रमांक ७५३) महामार्गाचे काम पूर्ण झाले आहे. जागोजागी फोडलेले दुभाजक व गतिरोधक नसल्याने २०२१ पासून चार किमी अंतरात अपघातांची मालिका आजही सुरूच आहे. गाव परिसरातील कोणत्याच रस्त्यावर गतिरोधक नाहीत, अनावश्यक ठिकाणी दुभाजक फोडले, दुतर्फा बाजूने वाहनांची अवैध पार्किंग वाढली आहे. तसेच दुचाकीस्वार सुसाट गाड्या पळवतात. वेळ वाचवण्यासाठी राँग साइडने वाहन चालवणे, मोकाट जनावरांचा मुक्तसंचार, ग्रामपंचायत प्रशासनाकडून उपाययोजना नाहीत आणि सर्वात महत्त्वाचे वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष असल्याने अपघात वाढले आहेत.

वेळीच उपाययोजना करा, अन्यथा आंदोलन करू. –विलास काळे, ग्रामस्थ.

या मार्गावर जिल्हा परिषद व कै. लक्ष्मणराव पाटील या दोन शाळांत तब्बल १५०० हून अधिक विद्यार्थी पायी ये– जा करतात, या चिमुकल्या जीवांना सर्वाधिक धोका निर्माण झाला आहे. दर एक–दोन दिवसांआड अपघातातील जखमी उपचारासाठी आमच्याकडे येतात.

वाहनांच्या वेगावर नियंत्रण नसल्याने व रस्त्याचा अंदाज नसल्याने अपघात घडत आहेत. –डॉ. सुभाषचंद्र काळे, शिवना वाहने राँग साइडने चालवू नका, वळवताना दोन्ही बाजूंनी वाहने येत नसल्याची खात्री करूनच रस्ता क्रॉस करा. रस्त्यावर अवैध वाहने उभी करून स्थानिक व्यावसायिकांनी तसेच दुचाकी वाहनधारकांनी अडथळा निर्माण केला आहे, अशा वाहनधारकांवर कारवाई करण्यात येईल. कुणीही रस्ते व वाहतूक नियम पायदळी तुडवू नये. ठेकेदारांनी काम पूर्ण केलेले नाही, अजूनही बऱ्याच त्रुटी आहेत. हा रस्ता केंद्रीय रस्ते प्राधिकरण धुळे विभागाकडे वर्ग केल्याने त्यांच्याशी आजवर संपर्क होऊ शकलेला नाही. वेळीच उपाययोजनांची मागणी होत आहे.

# पोलिसाला उमेदवारासोबत फिरणे भोवले

## पोलिस अधीक्षकांनी केली निलंबनाची कारवाई

हिंगोलीर। प्रतिनिधी

हिंगोली पालिका निवडणुकीत राजकिय पक्षाच्या उमेदवारासोबत प्रचारासाठी फिरल्याच्या आरोपावरून पोलिस कर्मचाऱ्यास तडकाफडकी निलंबित करण्यात आले असून त्यांच्या निलंबनाचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुरुवारी ता. २० काढले आहेत. पोलिस अधीक्षकांच्या कडक भूमिकेमुळे पोलिस दलात खळबळ उडाली आहे. हिंगोली जिल्ह्यात हिंगोलीसह कळमनुरी व वसमत पालिकेची निवडणूक होत आहे. या निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या तीनही शहरांमध्ये येणाऱ्या मार्गावरील वाहनांची तपासणी करण्यासाठी पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून सर्व वाहनांची तपासणी केली जात आहे. रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या संशयितांची चौकशीही केली जात आहे.

याशिवाय प्रत्येक प्रभागासाठी एक पोलिस निरीक्षक व चार पोलिस कर्मचारी नियुक्त करण्यात आलेत. त्या भागात अनुचित प्रकार होत असल्याची माहिती मिळताच अवघ्या पाच मिनिटांत पोलिस घटनास्थळी पोहोचून कारवाई करणार आहेत. त्यासाठीचे नियोजन देखील पोलिस अधिक्षक कोकाटे यांनी केले आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडण्यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांनाही आवश्यक सूचना दिल्या आहेत.

मात्र स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत पोलिस कर्मचारी बालाजी गुंडे हे एका राजकिय पक्षाच्या उमेदवारासोबत फिरत असल्याचे छायाचित्र व तक्रार पोलिस अधीक्षक कार्यालयाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार या तक्रारीची चौकशी सुरु करण्यात आली आहे. सदर चौकशी पूर्ण होईपर्यंत पोलिस कर्मचारी गुंडे यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या निलंबनाचे आदेश पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी काढले आहेत. त्यांच्या या कठोर कारवाईमुळे पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे.

# देवळाणा तलाव प्रकरणात शेतकऱ्यांचा सुप्रीम कोर्टात विजय

संभाजीनगर। प्रतिनिधी

कन्नड तालुक्यातील देवळाणा बृहद लघु तलाव प्रकरणात शेतकऱ्यांच्या बाजूने मोठा न्याय निर्णय लागला आहे. महाराष्ट्र शासनामार्फत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांनी दाखल केलेली स्पेशल लिव्ह पिटीशन सर्वोच्च न्यायालयाने थेट फेटाळून लावली. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालय आणि औरंगाबाद खंडपीठाने दिलेला शेतकऱ्यांच्या बाजूचा आदेश अबाधित राहिला असून, बाधित जमिनींचे सहा आठवड्यांत भूसंपादन करणे शासनाला बंधनकारक झाले आहे.

सन २००१ मध्ये मंजूर आणि २००५–०६ मध्ये पूर्ण झालेले देवळाणा तलावाचे बांधकाम पावसाळ्यात पूर्ण क्षमतेने भरले; मात्र बांधकामातील दोषांमुळे २०१०–११ पासून दरवर्षी ५० ते ६० हेक्टर शेती बॅकवॉटरमुळे पाण्याखाली जात होती. पिकांचे आणि फळझाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असूनही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई न झाल्याने याचिकाकर्त्यांनी



ॲडव्होकेट पूनम बोडके पाटील यांच्या माध्यमातून याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. न्यायमूर्ती मनीष पितळे आणि न्यायमूर्ती खोब्रागडे यांनी (दि. २५) सप्टेंबर २०२५ रोजी शेतकऱ्यांच्या बाजूने स्पष्ट आदेश देत बाधित जमिनी सहा आठवड्यांत भूसंपादित करण्याचे निर्देश दिले होते. या आदेशाविरुद्ध शासनाने सर्वोच्च न्यायालयात पिटीशन दाखल केली; मात्र सर्वोच्च न्यायालयाने ती फेटाळत उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला. त्यामुळे भूसंपादन प्रक्रिया निश्चित कालावधीतच पूर्ण करावी लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णायक निकालामुळे देवळाणा शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, राज्यातील इतर जलसंधारण प्रकल्पांमधील बाधित शेतकऱ्यांसाठीही हा आदेश महत्त्वाचा ठरणार आहे.

# अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणात आरोपीस तत्काळ अटक

लातूर। प्रतिनिधी

लातूर शहरातील गांधी चौक पोलिस ठाणे हद्दीत घडलेल्या अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाच्या गंभीर प्रकरणात लातूर पोलिसांनी अतिशय जलद, काटेकोर आणि संवेदी पद्धतीने कारवाई करत आरोपीस अटक केली. विशेष म्हणजे, गुन्हा नोंद झाल्यानंतर केवळ २० तासांत तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोप पत्रही दाखल केले आहे.

तक्रारीनुसार १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी अडीचच्या सुमारास इसराईल कलीम पठाण (वय २७, रा. गौसपुरा, लातूर) हा फिर्यादीच्या घरात अनधिकृतपणे घुसला आणि अल्पवयीन मुलीचा हात धरून विनयभंग केला. यापूर्वीही आरोपीने मुलीचा वारंवार पाठलाग करणे, तसेच तिच्या कुटुंबीयांना जिवे मारण्याच्या धमक्या देणे असे प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. या सततच्या त्रासामुळे पीडितेच्या कुटुंबावर मोठा मानसिक ताण निर्माण झाला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गांधी चौक पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७८, ३३३, ३५१(२) (३) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ८ व १२ नुसार नोंदविण्यात आला. गुन्हा नोंद होताच पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी केलेल्या सूचनांनुसार अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलिस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक सुनील रेजितवाड यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी दोन स्वतंत्र पथके तयार केली. गुप्त माहिती व स्थानिक तपासाच्या आधारे आरोपी इसराईल पठाण यास ताब्यात घेण्यात आले आणि कायदेशीर अटक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. तपास अधिकारी पोउपनि गणेश चित्ते यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पुरावे संकलित करून आरोपीविरुद्ध केवळ २० तासांत आरोपपत्र न्यायालयात दाखल केले. या कारवाईत महिला व पुरुष पोलिस कर्मचारींचा सक्रिय सहभाग राहिला. अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, छेडछाड किंवा संशयास्पद हालचाली तातडीने पोलिसांना कळवाव्यात, असे आवाहन लातूर पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# उसाला २५०० रुपये दर, शेतकऱ्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेत संताप

संभाजीनगर। प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी यांच्या उसाला साखर कारखान्याने गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी दर जाहीर करावा, अशी मागणी स्वाभिमान शेतकरी संघटनेने केली होती. परंतु तालुक्यातील गूळ पावडर निर्मिती करणाऱ्या कारखान्यांनी २५०० रुपये उसाला दर जाहीर केल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणाऱ्या स्वाभिमान शेतकरी संघटनेत संतापाची लाट निर्माण होऊन ऊस कारखानदाराविरुद्ध व्यापक स्वरूपात आंदोलन उभे करण्याचा इशारा दिला आहे.

पैठण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर उसाचे क्षेत्र असून, या उसावर अनेक शेतकरी अवलंबून आहेत. तालुक्यात दोन साखर कारखाने व दोन गूळ पावडर निर्मिती करणारे कारखाने आहेत. या कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य ऊस दर चालू गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वी दर जाहीर करावा, अशी मागणी स्वाभिमान शेतकरी संघटनेने केली होती. ऊस दर जाहीर होत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस देऊ नये, अशा



स्वरूपाचे आवाहन करून आंदोलन सुरू केले होते.

दि. २८ ऑक्टोबर रोजी कारखान्यांना तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हा अध्यक्ष ज्ञानदेव मुळे यांनी निवेदन देऊन दि. १९ नोव्हेंबरपर्यंत संबंधित कारखान्यांनी ऊस दर जाहीर करून गाळप हंगाम सुरू करावा, अशी मागणी केली होती. यामुळे तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गुलमेश्वर नॅचरल शुगर प्रा. लि. ब्रह्मनाथनगर नवगाव, ता. पैठण या गूळ पावडर निर्मिती करणाऱ्या कारखान्याने चालू हंगामात उसाला २५०० चा दर जाहीर केल्यामुळे ऊसउत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने व्यापक स्वरूपात आंदोलन उभारण्याचा पवित्रा घेतला आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७२६/२०२५**

**ॲड. घुमरे बी. बी.**

अर्जदार १) शांता भ्र. देविदास कुलकर्णी, वय–७७ वर्षे, धंदा–घरकाम, रा. बिंदुसरा कॉलनी, नगर रोड बीड ता. जि. बीड., २) शशिकांत पि. देविदास कुलकर्णी, वय–६१ वर्षे, धंदा–सेवानिवृत्त, रा. त्रिमुर्ती कॉलनी, दत्त नगर, बीड ता. जि. बीड., ३) संजय पि. देविदास कुलकर्णी, वय–५७ वर्षे, धंदा–नौकरी, रा. रेल्वे स्टेशन रोड, स्वामी विवेकानंद चौक जालना ता. जि. जालना., ४) धनंजय पि. देविदास कुलकर्णी, वय–५४ वर्षे, धंदा–नौकरी, रा. वॉटर टँक जवळ, बीड ता. जि. बीड., ५) अलका भ्र. विजयकुमार कुलकर्णी, वय–६३ वर्षे, धंदा– घरकाम, रा. थर्मल कॉनली, परळी ता. परळी जि. बीड. ६) रंजना भ्र. रमेशराव कुलकर्णी, वय–५७ वर्षे, धंदा–घरकाम, रा. बिंदुसरा कॉलनी, नगर रोड बीड ता. जि. बीड., ७) संध्याराणी देविदासराव कुलकर्णी, वय–४६ वर्षे, धंदा–घरकाम, रा. बिंदुसरा कॉलनी, नगर रोड बीड ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार : अर्जदार हे भारतीय आहेत प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे देविदास मुरलीधर कुलकर्णी यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे देविदास मुरलीधर कुलकर्णी, रा. बिंदुसरा कॉलनी, नगर रोड, बीड, ता. जि. बीड हे दिनांक १०/०२/२०१२ रोजी बिंदुसरा कॉलनी, नगर रोड, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ५ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई वडील हे फार वर्षा पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक २०/१२/२०२५

आज दिनांक /११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली

स्वाक्षरित
आदेशावरुन
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

स्वाक्षरित
क.लि

# कोपरगावात जोडप्यावर हल्ला करणारा बिबट्या जेरबंद

## नरभक्षक बनत असलेल्या बिबट्यांच्या दहशतीला लगाम

अहिल्यानगर

अहिल्या नगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात मागील पंधरा दिवसात बिबट्याच्या हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर एका नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात आले. मात्र, १८ नोव्हेंबरला दुचाकी स्वार जोडप्यावर बिबट्याने हल्ला चढवून गंभीर जखमी केल्याची घटना समोर आली होती. या पार्श्वभूमीवर वन विभागाने तातडीने पिंजरे लावून हल्लेखोर बिबट्याला गुरुवारी (२० नोव्हेंबर) पहाटे जेरबंद केले. दरम्यान, बिबट्यांचे माणसांवरील हल्ले वाढत असल्याने बिबटे नरभक्षक बनत असल्याच्या चर्चांना पुन्हा जोर आला आणि त्यांच्या बंदोबस्ताची मागणी तीव्र झाली होती. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी–माहेगाव देशमुख रस्त्यावर दुचाकीवरून दवाखान्यात निघालेल्या एका जोडप्यावर



बिबट्याने अचानक हल्ला केला होता.या हल्ल्यात भाऊसाहेब नारायण वाघडकर (वय ६२) आणि आशाबाई भाऊसाहेब वाघडकर (वय ५५) हे गंभीर जखमी झाले होते. या पार्श्वभूमीवर उपवन संरक्षक धर्मवीर सालविठ्ठल आणि सहाय्यक वन संरक्षक गणेश मिसाळ यांच्या आदेशानुसार वनक्षेत्रपाल नीलेश रोडे यांच्या पथकाने तातडीने पिंजरा लावला. गुरुवारी पहाटेच्या सुमारास हा हल्लेखोर बिबट्या पिंजऱ्यात अडकला. बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती मिळताच ग्रामस्थांनी त्याला पाहण्यासाठी गर्दी केली. कोपरगाव तालुक्यात बिबट्याची दहशत अजूनही पूर्णपणे संपलेली नाही. शेतीची कामे करणे अवघड झाले असून, रात्रीचा दुचाकी प्रवासही धोकादायक बनला आहे, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. वन विभागाने यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# चंदनाच्या झाडांची कत्तल

## ६ चोरटे ताडकळस पोलिसांच्या जाळ्यात

परभणी। प्रतिनिधी

ताडकळस पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तटुजवळा फाटा (ता.परभणी) येथील शेतशिवारात चंदनाची अवैध कटाई करून अंदाजे ६४, ४०० रुपयांचे चंदन लाकूड वाहतूक करताना सहा आरोपींना ताडकळस पोलिसांनी रंगेहात पकडले.

पोलिसांनी पकडलेले आरोपी असे मेहताब खॉ अहमद खॉ पठाण (४५, रा. कुरुंदा, ता. वसमत, जि. हिंगोली), सय्यद अहमद सय्यद मुर्तुजा (३६, रा. कुरुंदा, ता. वसमत, जि. हिंगोली), शेख आलीम शेख जानी (३२, रा. वसमत, जि. हिंगोली), शेख कलीम शेख पाशा (रा. कुरुंदा, ता. वसमत, जि. हिंगोली), बबलु खदीर शेख (रा. वसमत), शेख फारुक शेख लतीफ (रा. कुरुंदा, ता. वसमत) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चंदन लाकूड किंमत ६४,४०० रुपये, तीन लोखंडी कुऱ्हाडी, धार देण्याचे साहित्य, मोटारसायकल असा १,२४,८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्राथमिक चौकशीत आरोपी यांनी शासनाने बंदी घातलेल्या चंदनाची अवैध



तोड करून विक्री करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले.

या प्रकरणी ताडकळस पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस उपनिरीक्षक सतीश तायडे व रणेर करत आहेत. मोटारसायकलसह तिन्ही प्रमुख आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

# महापालिका निवडणुकीनंतरच शहराला मिळणार ४० नव्याकोऱ्या इलेक्ट्रिक बस

## निधीअभावी केंद्राचा पीएम ई–बस प्रकल्प संथ, चार्जिंग स्टेशनचे ६० टक्के काम पूर्ण

अहिल्यानगरर। प्रतिनिधी

पीएम ई–बस योजनेतून अहिल्यानगर शहरात अंतर्गत दळणवळणासाठी ४० बस येणार आहेत. महापालिकेमार्फत विद्युतीकरण व चार्जिंग स्टेशनचे काम केडगाव सोनेवाडी रस्त्यावर सुरू आहे. केंद्र सरकारकडून पहिल्या टप्प्यात ३.६१ कोटींचा निधी उपलब्ध झाला. सद्य:स्थितीत ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र, उर्वरित निधी अद्यापही मिळालेला नसल्याने प्रकल्प अडचणीत सापडला आहे. उच्चदाब वाहिनीसाठीचा निधीही रखडल्याने प्रकल्पाचे काम संथगतीने सुरू आहे. परिणामी, हा प्रकल्प आता महापालिका निवडणुकीनंतरच पूर्ण होणार आहे.

अहिल्यानगर शहराला गरजेनुसार ३५ सीटच्या ४० बसेस उपलब्ध होणार आहेत. महापालिका प्रशासनाने पीएम–ई बस डेपोसाठी आणि चार्जिंग स्टेशनसाठी केडगाव–सोनेवाडी स्त्यावर सुमारे अडीच एकर जागेत काम सुरू केले आहे. तेथील विद्युतीकरण व स्थापत्य कामासाठी एकूण ९.०६ कोटींचा निधी मंजूर आहे. त्यापैकी महापालिकेला ३.६१ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. प्रत्यक्षात उपलब्ध निधीपेक्षा अधिक काम पूर्ण झाले आहे. निधी रखडला असला तरी महापालिकेने बस डेपोचे काम थांबविलेले नाही. मात्र, संथगतीने काम सुरू आहे. लवकरात लवकर निधी उपलब्ध न झाल्यास काम रखडून प्रकल्प अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत प्रकल्प सुरू होण्यासाठी मोठा अवधी लागण्याची चिन्हे असल्याने मनपा निवडणुकीपूर्वी प्रकल्प मार्गी लावून बसेस उपलब्ध होण्याची शक्यता मावळली आहे.सोनेवाडी सब स्टेशनपासून महापालिकेच्या सबस्टेशनपर्यंत विजेचा पुरवठा करणारी उच्चदाब वाहिनी टाकण्याचे काम महावितरणमार्फत प्रस्तावित आहे. या कामासाठी केंद्र सरकारने महावितरणला १.९७ कोटी रुपयांचा निधी वर्ग केला आहे. त्यातून निविदा प्रक्रिया होऊन काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने अद्यापही वीजपुरवठा उपलब्ध झालेला नाही. निधी वेळेत मिळाल्यास दोन महिन्यात काम पूर्ण शासनाकडून पहिल्या टप्प्यात २.६१ कोटींचा निधी उपलब्ध झाला होता. त्यातून काम सुरू करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सुमारे ४ ते साडेचार कोटींचे काम पूर्ण झाले असून, अद्यापही काम थांबलेले नाही. काही महिन्यांपूर्वी एक कोटीचा निधी उपलब्ध झाला आहे. उर्वरित निधीबाबत शासनाकडे मागणी केली आहे. मनपाकडून प्रस्तावित विद्युतीकरणाचे कामही सुरू आहे. निधी वेळेत मिळाल्यास येत्या दोन महिन्यात काम पूर्ण होईल.

# निष्ठावंतांना धतुऱ्या अन् उपऱ्यापुढे पायघड्या

## जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकीत निष्ठावान देणार दणका

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुका सर्वच पक्षांनी प्रतिष्ठेच्या बनवल्या आहेत मात्र सर्वच पक्षांनी अनेक निष्ठावंतांना डावलून बाहेरच्या उमेदवाराला उमेदवारी दिल्यामुळे अनेक निष्ठावंत पदाधिकारी नाराज आहेत ही काही एकाच पक्षातील स्थिती नाही सर्वच पक्षांमध्ये ही परिस्थिती असल्याने आता प्रत्येक पक्षातील निष्ठावंत विरोधामध्ये हत्यार उपसायला तयार झाले आहेत त्यामुळे जिल्ह्यात निष्ठावंतांना धतुऱ्या आणि उपऱ्यांपुढे पायघड्या घातल्याचे चित्र दिसत आहे.**



बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेच्या निवडणुका सुरू आहेत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख काही दिवसावर असताना अनेक महाराजांचे अर्ज मागे घेण्यासाठी प्रमुख पक्षाचे पदाधिकारी त्यांचा शोध घेत आहेत मात्र एकंदरीत परिस्थिती पाहिली तर ज्यांनी गेल्या चार वर्षापासून उमेदवारी मिळेल या आशेने आपल्या क्षेत्रामध्ये काम सुरू केले होते मात्र बहुतांशी उमेदवारांना ऐनवेळी डावल्ली गेले ही परिस्थिती बीडमध्येच नाहीतर जिल्ह्यातील गेवराई माजलगाव अंबाजोगाई परळी या नगरपालिका क्षेत्रात पहावयास मिळत आहे प्रमुख पक्ष असलेल्या राष्ट्रवादी शरद पवार गट राष्ट्रवादी अजित पवार गट शिवसेना उद्धव ठाकरे गड शिवसेना एकनाथ शिंदे गट भाजपा वंचित बहुजन आघाडी आणि एम आय एम यासह काँग्रेस पक्षाने देखील निष्ठावान कार्यकर्त्यांना थोडेसे दूर केल्याचे दिसत आहे विशेषता सर्व परिस्थिती पहात अचानक बाहेरचे उमेदवार ज्यांचा पक्षाशी कधीही संबंध नाही ज्यांनी पक्षावर कधी निष्ठा दाखवली नाही अशांना उमेदवारी दिली गेली बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्राध्यापक सुशीला मोराळे डॉक्टर सानप शिवसेनेचे राजीव महू वाले यांनी आपल्या पक्षाच्या पदाचे व सदस्यत्वाचे राजीनामे दिले बीडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अनेक निष्ठावान कार्यकर्ते असताना ऐनवेळी कोणालाही माहीत नसलेले उमेदवार श्रीमती पारवे यांना उमेदवारी दिली गेली भाजपाकडूनही अनेक इच्छुक असताना डॉक्टर श्रीमती घुमरे यांनाही अशीच अचानक उमेदवारी दिली गेली वंचित बहुजन आघाडी एमआयएम हे देखील अपवाद नाहीत परळी मध्ये धनंजय मुंडे यांचे समर्थक असलेले माजी नगराध्यक्ष देशमुख यांना ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने उमेदवारी दिली मात्र परळी मध्ये आघाडीत बिघाडी झाल्यानंतर काँग्रेसने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला ते देखील मैदानात उतरल्याने तेथे रंगत वाढली आहे माजलगाव मध्ये गेवराई मध्ये अशीच काहीशी परिस्थिती आहे त्यामुळे पक्षासाठी सत्रांच्या उचलणारे कार्यकर्ते बाजूला गेल्याचे सध्यातरी दिसत आहे गेवराई मध्ये कधीकाळी भाजपा आमदार लक्ष्मण पवार शिवसेनेचे माजी मंत्री बदामराव पंडित यांचे निकटवर्ती असलेले दाभाडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने उमेदवारी दिली हे देखील अनेकांना खटकले आहे निष्ठावान कार्यकर्त्यांना डावल्यामुळे त्यांच्या नाराजीचा फटका त्या पक्षाला नक्कीच बसणार हे मात्र निश्चित आहे

## पत्रकार अर्जुन मुंडे यांना 'संविधान गौरव पुरस्कार' जाहीर

### ३० नोव्हेंबर रोजी पुणे येथे होणार पुरस्कार वितरण

**वडवणी । प्रतिनिधी**

दि बौद्धिस्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने प्रतिष्ठित संविधान गौरव पुरस्कार यावर्षी पत्रकार अर्जुन मुंडे यांना जाहीर झाला आहे. गौरव संविधानाचा कार्यक्रमात ३० नोव्हेंबर रोजी सावित्रीबाई फुले सभागृह पिंपरी चिंचवड पुणे येथे या पुरस्काराचे वितरण विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



वडवणी तालुक्यातील चिंचाळा गावचे रहिवासी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई वडवणी तालुका सचिव अर्जुन मुंडे ग्रामीण भागाशी त्यांची नाळ असल्याने त्यांनी ग्रामीण भागातील ज्वलंत प्रश्न सातत्याने आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून मांडलेले आहेत.ग्रामीण भागातील शेत मजुरांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी, शासकीय योजना, हक्क व सुविधा वृत्तपत्राच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून शासन दरबारी पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम अर्जुन मुंडे यांनी आपल्या प्रखर पत्रकारितेतून केले आहे. सामाजिक भान आणि जबाबदारी जपत ग्रामीण भागाचा आवाज बुलंद करण्याच्या अर्जुन मुंडे यांच्या कार्याची दखल घेत दि बौद्धिस्ट फाउंडेशनने संविधान गौरव या पुरस्कारासाठी पत्रकार अर्जुन मुंडे यांची निवड केलेली आहे.

तरी संविधान गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या कार्यक्रमाचे आयोजन शिवाजीराव झोडगे दि. बौध्दिष्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे.

## आम आदमी पार्टी न. प.निवडणूक रिंगणात

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीत आम आदमी पार्टीने स्वबळावर दमदार पणे प्रवेश केला असून नगराध्यक्ष पदासह १६ प्रभागांत उमेदवार निश्चित करण्यात आले आहेत. लोकाभिमुख, पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त पर्याय उभा राहिल्याने वर्षानुवर्षे सत्ता भोगणाऱ्या प्रस्थापित गटांचे धाबे दणाणले आहेत.

शहरातील मतदारांना खऱ्या अर्थाने विकासाचा, प्रामाणिकतेचा आणि स्वच्छ राजकारणाचा पर्याय मिळत असल्यामुळे काही



विरोधक आम आदमी पार्टीच्या उमेदवारांना लालच, दबाव व दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत.परंतु आम आदमी पार्टीचा एकही कार्यकर्ता वा उमेदवार दबावाला बळी पडणार नाही. कारण ◀◀ पान ३ वर

## प्रा. सुशीलाताई मोराळे यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा राजीनामा

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचा मी प्राथमिक सदस्यत्वाचा आणि महासचिव पदाचा राजीनामा देत आहे. पक्षश्रेष्ठींकडे हा राजीनामा मी पाठवला आहे. माझा राजीनामा मंजूर करून मला पदमुक्त करावे अशी विनंती आपण माननीय अध्यक्ष शशिकांत शिंदे यांना केली आहे. पक्षात काम करताना होत असलेली कुचंबना व गळ चेपी तसेच लोकसभेला उमेदवारी नाकारली. विधानसभेलाही



उमेदवारी नाकारली. नगरपरिषद बीडच्या निवडणुकीत वार्ड क्रमांक ११ मधून राजेंद्र सानप यांच्या पत्नी मीराताई सानप यांना मी शिफारस करूनही उमेदवारी नाकारली राजेंद्र सानप २६ वर्ष पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. मी जिल्हाध्यक्षांकडे मीराताई सानप यांना महिला ओबीसी प्रवर्गातून उमेदवारी द्या असा आग्रह मी केला परंतु त्यांची उमेदवारी नाकारली एकंदर पक्षात चालू असलेल्या मनमानी मुळे आणि माझी होत असलेली कुचंबना यामुळे मी पक्ष सोडत आहे. गेली ४० वर्ष समाजवादी राजकारणातली मी कार्यकर्ता आहे. जनता पार्टी जनता दल परिवारात वाढलेली मी आहे. अशी कुचंबना मी सहन करू शकत नाही म्हणून मी राजीनामा दिला आहे.

## कापसाच्या शेतात गांज्याची लागवड

बीड । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील हेळंब येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा मारून २५ किलो शेतातील गांजा जप्त केला.

बीड जिल्हयाचे पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी दि.१६/११/२०२५ ते दि.२२/११/२०२५ या सप्ताहामध्ये जिल्हयातील सर्व उपविभाग व पोलीस स्टेशन पातळीवर एन.डी.पी.एस कायद्यान्वये कारवाई करण्याबाबत विशेष मोहीम राबवण्याचे आदेशीत केले होते. यावरुन शिवाजी बंटेवाड पोलीस निरीक्षक स्था.गु.शा बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व पथक प्रमुख यांना सदर विशेष मोहीमेअंतर्गत कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. दि. २०/११/२०२५ रोजी पोउपनि महेश विघ्ने हे त्यांचे पथकासह परळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहीती मिळाली की, हेळंब गावातील ईसम युवराज अण्णा आंधळे रा. हेळंब याने शेत गट क्रं ७४६ मधील त्याचे मालकीचे कापसाचे शेतात अवैद्यरित्या गांज्या झाडाची लागवड केली आहे. सदरची माहीती पोउपनि महेश विघ्ने यांनी वरीष्ठांना कळवुन पोलीस स्टेशन परळी ग्रामीण चे प्रभारी अधिकारी पो.नि. सय्यद यांनी दिली.वरीष्ठांची परवानगी प्राप्त करुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व पो.स्टे परीळी ग्रामीणचे पथक असे मिळुन बातमीदाराने सांगितलेप्रमाणे हेळंब गावातील शेत गट क्रं ७४६ मधील ईसम युवराज अण्णा आंधळे याचे मालकीचे कापसाचे शेतात पंचासह छापा मारला असता त्याचे कापसाचे शेतात वजनी २५.९५० कि.ग्रॅम चा गांज्या किं.१,२९,७५० रू चा मिळुन आला.

### शेतात स्था.गु.शा. चा छापा



## मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या डॉक्टरचा हृदयविकाराचा झटक्याने दुर्दैवी मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

पहाटेच्या थंडीत मॉर्निंग वॉकला जात असताना हृदयविकाराचा झटका आल्याने डॉक्टरचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दि २० नोव्हेंबर गुरूवार रोजी पाहटे माजलगावमध्ये घडली.डॉ. चंद्रशेखर उजगरे (५४) असे मयत डॉक्टरचे नाव आहे.डॉ.चंद्रशेखर उजगरे हे पशुवैद्यकीय अधिकारी असून सध्या वडवणी येथे शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यात ते कार्यरत होते.



या संदर्भात मिळालेली माहिती अशी की,शालेय जीवनात फुटबॉल खेळाडू असलेले डॉ.चंद्रशेखर उजगरे हे नियमित मॉर्निंग वॉकला जात असत.जवळपास तासभर वॉक केल्यानंतर ते व्यायाम करत असत हा त्यांचा नित्यनेम होता. नेहमीप्रमाणे ते दि २० नोव्हेंबर गुरुवार रोजी सकाळी पाहटे सहा वाजण्याच्या सुमारास डॉ.चंद्रशेखर उजगरे हे येथील सोळंके महाविद्यालयातील ट्रॅकवर वॉकिंग केल्यानंतर व्यायाम करत होते. यादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन ते कोसळले. वॉकसाठी आलेले अन्य शिक्षक आणि इतरांनी तात्काळ त्यांना खाजगी रुग्णालयात नेले.मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.डॉ.चंद्रशेखर उजगरे यांच्यावर सायंकाळी ५:०० वाजता शहरातील मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## पाटोदा तालुक्यात अंगणवाड्यातील आहाराचा बोजवारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील अंगणवाड्यांचा कारभार अक्षरशः राम भरोसे चालल्याचे चित्र समोर आले आहे. पाटोदा शहरात एकूण १९ अंगणवाड्या असूनही शासनाच्या नियमांची अंमलबजावणी शून्यावर आली आहे. बालकांना मिळणारा पोषण आहार, खेळणी, शैक्षणिक साहित्य यापैकी अनेक सुविधा प्रत्यक्षात दिसतच नाहीत.

शासनाने अनिवार्य केलेला मेनू कार्डचा चार्ट अंगणवाडीच्या बाहेर लावणे बंधनकारक असताना पाटोद्यातील बहुतेक ठिकाणी तो दिसूनही येत नाही. काही ठिकाणी तर चार्ट नावाची वस्तूच नाही. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली खेळणी, शिक्षणासाठी आवश्यक चार्ट, साधने यांचा पूर्णपणे अभाव आहे.

अंगणवाड्यांचे 'टायमिंग'ही गाजरगुलाबी!

सकाळी सुरू होणाऱ्या अंगणवाड्या अकरा वाजता उघडणे आणि बारा वाजता बंद करणे, हे रोजचेच वास्तव असल्याची माहिती पालकांकडून मिळाली. आठवड्यातून दोन–तीन दिवसच अंगणवाडी उघडणे ही तर अधिक गंभीर बाब आहे. 'मिटींग'च्या नावाखाली सुट्ट्या मारणे, मुलांना काय शिकवतात हे माहित नसणे– ही परिस्थिती अंगणवाडी सेविकांच्या कामकाजावर मोठा प्रश्नचिन्ह उभे करते.

सगळ्यात गंभीर आरोप – पोषण आहाराचा गैरवापर!

शासनाकडून येणारा पोषण आहार अर्धवट देणे किंवा बाहेरच बाहेर विकणे असा गंभीर आरोप पालकांनी केला आहे. शासन दरवर्षी अंगणवाड्यांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करते, मात्र त्याचा प्रत्यक्ष लाभ बालकांपर्यंत पोहोचत नाही, ही वस्तुस्थिती पालकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण करते.

अंगणवाडी प्रमुखांची बेफिकिरी उजेडात!

शहरातील अंगणवाड्यांच्या प्रमुख छाया जाधव यांना जबाब विचारण्यात आला असता त्यांनी – मेनू कार्ड बीडच्या कार्यालयातून घ्या मला देण्याचा अधिकार नाही अंगणवाड्यांची संख्या सांगता येत नाही मी कामानिमित्त बाहेर आहे अशा प्रकारची उत्तरे दिल्याने त्यांच्या नियंत्रणक्षमता व जबाबदारीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. विद्यार्थी संख्या, शाखांची संख्या, मूलभूत माहितीही न सांगणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कारभारावर पालकांनी संताप व्यक्त केला आहे.पालकांची मागणी – या भ्रष्ट बंदोबस्तावर ◀◀ पान ३ वर

## आपला नगरसेवक आपणच निवडा, सत्तेवर स्वत: बसा- सुजात आंबेडकर

बीड । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ताकदीने उतरून सर्व जागा जिंकण्याचा निर्धार वंचित बहुजन आघाडीने व्यक्त केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा भाग म्हणून बीडमध्ये जंगी सभा पार पडली.

शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न अद्याप प्रस्थापितांनी सोडवले नाहीत. विकास हवा असेल तर



आपल्या हक्काचा नगरसेवक स्वतः निवडून द्या, असे आवाहन सुजात आंबेडकर यांनी नागरिकांना केले.

ओबीसी आरक्षण, वंचित–शोषितांवरील अन्याय, एससी आरक्षणावर सुरू असलेले हल्ले, तसेच बौद्ध समाजाच्या हक्क–अधिकारांवरील अतिक्रमणअशा प्रत्येक संघर्षाच्या वेळी लढण्यासाठी फक्त वंचित बहुजन आघाडीच उभी राहते, असा ठाम संदेश त्यांनी दिला.◀◀ पान ३ वर

## लोक विकास महाआघाडीचे बळ वाढले ; समाजवादी पार्टीचा जाहीर पाठिंबा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोक विकास महाआघाडीला बुधवारी मोठा राजकीय हातभार मिळाला आहे. समाजवादी पार्टीने पत्रकार परिषद घेऊन लोक विकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व महाआघाडीच्या नगरसेवकपदासाठी उभ्या असलेल्या सर्वच उमेदवारांना अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. यामुळे लोक विकास महाआघाडीचे बळ वाढले आहे. पाठिंबा देणाऱ्या समाजवादी पार्टीचे लोकविकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांनी जाहीर आभार मानले आहेत. तर भाजप समर्थक विरोधकांच्या कोणत्याही भुलथापांना बळी न पडता सुज्ञ मतदारांनी लोक विकास



महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व सर्वच प्रभागातील नगरसेवकपदाच्या उमेदवारांना निवडून द्यावे असे आवाहन समाजवादी पार्टीच्या वतीने अंबाजोगाईतील सर्व सुजाण जनतेला करण्यात आले आहे.

अंबाजोगाईत बुधवार, दिनांक १९ नोव्हेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी सांगितले की, पापा मोदींच्या नेतृत्वाला अंबाजोगाईकरांची नेहमीच पसंती मिळाली आहे. अंबाजोगाईचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जनतेला पुन्हा एकदा पापा मोदी हेच नगराध्यक्ष म्हणून हवे आहेत. आम्ही आज या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून लोक विकास महाआघाडीला जाहीर पाठिंबा देत आहोत. असे ॲड.कांबळे म्हणाले. तर यावेळी बोलताना समाजवादी पार्टीचे अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले आहे की, लोक विकास आघाडीवर अंबाजोगाईकरांचा मोठा विश्वास आहे. कारण, याचे नेतृत्व राजकिशोर पापा मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, माजी उपनगराध्यक्ष बबनराव लोमटे आणि समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे हे सर्व जण करीत आहेत. आम्ही पुढील मुद्यांवर पाठिंबा दिला आहे. ते मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत. ते असे की, लोक विकास ◀◀ पान ३ वर

## मालेगाव चिमुरडीवरील अत्याचारातील आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी

लिंबागणेश । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात ३ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिला दगडाने ठेचून निर्घृणपणे हत्या केल्याच्या भीषण घटनने सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध करण्यासाठी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे गुरुवार, दि. २० रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार



निदर्शने केली.

निदर्शनाच्या सुरुवातीला स्व. यज्ञा दुसाने या चिमुरडीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी ''आरोपींना फाशीच झाली पाहिजे'', ''बलात्कार्यांना कायद्याची भीती निर्माण करा'' अशा घोषणा देत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

निवेदनाद्वारे खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या :

आरोपींवर कठोरात कठोर फाशीची शिक्षा व्हावी, खटला जलदगती विशेष न्यायालयात चालवावा, सर्व सहआरोपींवर तात्काळ ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ताम्हिणी घाटात थार दरीत कोसळली; ६ जणांचा मृत्यू, ड्रोनमधून दिसला गाडीच्या पत्र्याचा तुकडा

**माणगाव । प्रतिनिधी**

कोकणातील पर्यटन आणि निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी पुण्याहून निघालेल्या सहा तरुणांचा दरीत कोसळून अंत झाला. पुणे उत्तमनगर येथून १७ नोव्हेंबररोजी रात्रीच्या सुमारास थार गाडीतून कोकणात निघालेल्या पर्यटकांची गाडी ताम्हिणी घाटातील कोंडेथर गावाजवळील अतिअवघड वळणावर ५०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघाताने रायगड जिल्हा आणि पुणे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




या अपघातात प्रथम शहाजी चव्हाण (वय २२, रा. दत्त मंदीरा जवळ, भैरवनाथ नगर, कोंढवे धावडे, पुणे) पुनित सुधाकर शेट्टी ( वय २०, रा. पाण्याचे टाकीजवळ, कोपरेगाव, उत्तमनगर पुणे), साहिल साधू बोटे (वय २४, रा. कोपरेगाव, उत्तमनगर पुणे), महादेव कोळी (वय १८, रा. कोपरेगाव शाळेमागे, भैरवनाथ नगर, पुणे) , ओंकार सुनिल कोळी (वय १८, रा. कोपरेगाव शाळेमागे, भैरवनाथ नगर, पुणे), शिवा अरुण माने (वय १९, रा. पुणे) या सहा तरुणांचा मृत्यू झाला. मृतदेह बाहेर काढून माणगाव उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले आहेत. पुण्यातील १८ ते २४ वयोगटातील सहा तरुण १७ नोव्हेंबरच्या मध्यरात्री पुण्याहून (एम एच. १२ वाय ऐन. ८००४) या थार गाडीतून कोकणात येत होते. ताम्हिणी घाटातील कोंडेथर येथे उताराचा धोकादायक भाग असून या वळणावर लोखंडी संरक्षण कठडा बसवण्यात आला आहे. हा संरक्षित कठडा तोडून गाडीच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मोबाईल कॉल न लागल्याने नातेवाईक व मित्रांनी वारंवार फोन करण्याचा प्रयत्न केला, तसेच सोशल मीडिया, व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतु, या तरुणांकडून कोणताही प्रतिसाद न आल्याने चिंतेचे सावट पसरले. अखेर पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील वारजे उत्तमनगर पोलीस ठाण्यात हे सहा जण हरवले असल्याची तक्रार पुणे शहर उत्तमनगर पोलीस ठाणे येथे १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नोंदविण्यात आली. १९ नोव्हेंबरच्या रात्री माणगाव पोलिसांनी ताम्हिणी घाटात शोधमोहीम सुरू केली. तेव्हा एका अवघड वळणावर लोखंडी संरक्षण कठडा तुटलेला आढळला. ड्रोन उड्डाण केल्यानंतर घनदाट झाडीत थार कारचा एक भाग चमकताना दिसला व अपघात निश्चित झाला. रात्र झाल्याने तपास मोहीम थांबवावी लागली; मात्र २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० पासून पुन्हा मोठ्या प्रमाणात रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले. माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, महामार्ग वाहतूक शाखेचे अधिकारी, माणगाव तहसीलदार व त्यांचे महसूल कर्मचारी, रोहा येथील सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानचे समर्पण रेस्क्यू टीम, तसेच आपत्ती व्यवस्थापन दल यांनी संयुक्तपणे ३०० फुटांच्या दरीत उतरत जीवघेणा शोध सुरू केला. या मृतदेहाजवळ पोहोचण्यासाठी झाडे - झुडपे कापत रस्ता तयार करून, उंच दगडी तीव्र उतार पार करत रेस्क्यू टीम मृतदेहांपर्यंत पोहोचली. दुपारी ३.१५ वाजण्याच्या दरम्यान दरीतील झाडा झुडपात विखुरलेल्या अवस्थेत सहाही तरुणांचे मृतदेह मिळाले.



# पिंपरखेड येथील परिसरातील शेतात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद

**जांबुत । प्रतिनिधी**

मागील एक महिन्यापूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या शिवन्या बोंबे, भागुबाई जाधव आणि रोहन बोंबे यांच्या घटनानंतर वनविभागाकडून बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले जात आहेत. रोहन बोंबेच्या मृत्यूनंतर अलर्ट झालेल्या वनविभागाने ४८ तासांत एक बिबट जेरबंद करत नरभक्षक असलेल्या बिबट्याला ठार करण्यात यश मिळविले असून बुधवारी (दि.२०) रोजी रात्री आकरा वाजेच्या सुमारास पिंपरखेड (ता.शिरूर ) येथील पारगाव रोड परिसरात शेतकरी रामहरी बोंबे यांचे शेतात लावलेल्या पिंजऱ्यात सहा वर्षीय नर संवर्गातील बिबट्याला जेरबंद करण्यात आले.



तर मंगळवारी ( दि. १८ ) रोजी रात्री जुन्नर रोड परिसरातील वेताळबाबा वस्तीवर रेस्क्यू टीमच्या माध्यमातून तांत्रिक प्रणालींच्या आधारे धुमाकूळ घालणारा बिबट बेशुद्ध करून जेरबंद करण्यात आला. दोन्हीही बिबट्यांना माणिकडोह (जुन्नर) येथील बिबट निवारण केंद्रात नेण्यात आल्याची माहिती सहायक वनसंरक्षक स्मिता राजहंस यांनी दिली. पिंपरखेड ,काठापूर खुर्द, जांबूत, फाकटे , चांडोह ,शरदवाडी , वडनेर खुर्द परिसरात बिबट्यांची संख्या मोठी असून झालेल्या हल्ल्यांची संख्या पाहता वनविभागाकडून विविध भागांत पिंजरे लावण्यात आलेले आहे. समूहाने फिरणाऱ्या बिबट्यांना तात्काळ जेरबंद करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत.

सध्याच्या काळात उसाचे तोडीचा हंगाम सुरु झाल्याने बिबट्यांचा मुक्त संचार वाढला असून उसाचे शेतातील त्यांचे वास्तव्य आता मका, ज्वारी यांचेसह शेतकऱ्यांच्या इतर पिकांमध्ये वाढू लागण्याने शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली असून पिंजऱ्यांची संख्या वाढवून या बिबट्यांना वेळीच जेरबंद करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून करण्यात येत आहे.

# एरंडवणेत पहाटे रेस्टॉरंट-बारमध्ये दरोडा; शस्त्राच्या धाकाने रोकड लुटली

**पुणे । प्रतिनिधी**

तोंडाला मास्क लावून आलेल्या चौघांनी एरंडवणे येथील एका रेस्टॉरंट ण्ड बारमध्ये शस्त्राच्या धाकाने लुटमार केली. गल्ल्यातील पंधरा ते वीस हजारांची रोकड जबरदस्तीने घेऊन लुटारूंनी पळ काढला. याप्रकरणी, लक्ष्मीकांत मोहन गुंजकर (वय ३५, रा. आंबेगाव बुद्रुक) यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी चौघा अनोळखी आरोपींच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार बुधवारी (दि.१९) पहाटे दीडच्या सुमारास अनंत रेस्टॉरंट ण्ड बार शॉप क्रमांक तीन, सूर्या टॉवर म्हात्रे बिज रोड एरंडवणे परिसरात घडला आहे.

बुधवारी पहाटे तोंडाला मास्क लावलेले चौघेजण अनंत रेस्टॉरंट ण्ड बारमध्ये घुसले. त्यांच्याकडे धारधार हत्यारे होती. त्या हत्याराचा धाक दाखून त्यांनी बारच्या गल्ल्यातील पंधरा ते वीस हजारांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर चौघांनी तेथून पळ काढला.

दरम्यान, हा प्रकार घडल्यानंतर गुंजकर यांनी डेक्कन पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली. परिसरातील सीसीटीव्ही चित्रिकरणावरून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत, अशी माहिती डेक्कन पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरिषा निंबाळकर यांनी दिली. सोमवारी (दि.१७) पहाटेदेखील याच रेस्टॉरंट बारमध्ये चौघांनी एका तरुणाला मारहाण केली होती. या प्रकरणी, नारायण पेठेतील २७ वर्षीय तरुणाने दिलेल्या फिर्यादीनुसार, डेक्कन पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी तरुण बाथरुममधून बाहेर येत होता. त्यावेळी चौघांनी त्याला धक्का लागल्याच्या कारणातून बेदम मारहाण केली. मारहाणीत लोखंडी कडे लागल्याने तरुण जखमी झाला.

# अतिक्रमण हटवण्यासाठी शेतकरी कुटुंबं रस्त्यावर, तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

**इंदापूर । प्रतिनिधी**

रुई (पिंपळाचा मळा) येथील मारकड, पारेकर आणि चोरमले कुटुंबीयांनी गट क्रमांक ४१६ मधील आपल्या कायदेशीर हिश्याप्रमाणे जमीन मिळावी, तसेच अतिक्रमण तात्काळ हटवावे, या ठाम मागणीसाठी सोमवार (दि. १७) पासून इंदापूर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरू केले आहे. महसूल विभागाकडून गेल्या काही वर्षांपासून केवळ आश्वासने मिळत असल्याने संतप्त शेतकरी शेवटचा उपाय म्हणून उपोषणाच्या मार्ग अवलंबला आहे.



गट क्रमांक ४१६ मधील ७ हेक्टर १५ आर क्षेत्रावर चार सहखातेदारांचा कायदेशीर मालकी हक्क आहे, त्यानुसार प्रत्येक कुटुंबास १/४ हिशा मिळणे अपेक्षित आहे. मात्र, काही अतिक्रमणधारकांनी आपल्या हिश्यापेक्षा अधिक क्षेत्र बळकावत कुंपण उभारले आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या वादात प्रशासनाने कोणतीही ठोस भूमिका न घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप आहे.

यापूर्वी २७ मार्च २०२३ रोजी उपोषण छेडण्यात आले होते. तेव्हा 'हिस्सेवाटप करून देऊ' असे आश्वासन मिळाल्याने आंदोलन स्थगित केले होते. पण त्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही. अतिक्रमणधारकांचे वर्तन आडदांड व आक्रमक असल्याचा आरोप करत, उपोषणकर्त्यांनी आपल्या कुटुंबीयांच्या सुरक्षेविषयी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. आमच्या जीवितास धोका झाल्यास त्यास अतिक्रमणधारकच जबाबदार राहतील, असे त्यांनी सांगितले आहे. तहसील कार्यालयासमोर शांतपणे सुरू असलेल्या या उपोषणाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# पुण्यात भाजप 'एकला चलो रे'!

## महापालिका निवडणुकीसाठी युतीला रामराम, इनकमिंगलाही ग्रीन सिग्नल

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असताना भाजपकडून शहरात बैठकींचा जोर वाढला आहे. स्वबळावर लढण्याची तयारी जवळपास पूर्ण झाली असून, महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादीला दूर ठेवण्याची भूमिका भाजपकडून घेतली जात आहे. त्यामुळे महायुतीत लढण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या शिवसेनेची कोंडी झाली आहे. त्याच वेळी भाजपला राजकीयदृष्ट्या कोंडीत पकडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने समविचारी पक्षांसोबत आघाडी करण्याचे संकेत दिले आहेत.



परिणामी, पुण्यात महायुतीतील तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.मागील तीन वर्षांपासून रखडलेल्या निवडणुका जानेवारी २०२६ मध्ये होण्याची शक्यता आहे. २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे ९८ नगरसेवक निवडून आले होते. त्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील पाच माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने भाजपची संघटनात्मक ताकद वाढली आहे.

जवळपास सर्व प्रभागांत इच्छुकांची मोठी संख्या असल्याने स्थानिक पदाधिकाऱ्यांनी महायुती नको, अशी भूमिका वरिष्ठांकडे मांडली आहे. वरिष्ठांकडूनही युतीचा निर्णय स्थानिक पातळीवर घ्यावा, असा निर्देश देण्यात आला आहे. त्यामुळे भाजप स्वबळावर निवडणूक लढविण्याच्या भूमिकेवर ठाम दिसत आहे.त्यातच भाजपकडून युतीबाबत कोणताही स्पष्ट प्रतिसाद न मिळाल्याने शिवसेनेतही अनिश्चितता आहे.

शिवसेनेचाही स्वबळाचा नारा

शिवसेनेची महायुतीतून निवडणूक लढण्याची तयारी आहे. मात्र, निर्णय वरिष्ठ पातळीवर होईल, असे शहरप्रमुख नाना भानगिरे यांनी सांगितले. युती झाली तर आम्हाला ४० ते ४५ जागांची अपेक्षा आहे, तसेच युती न झाल्यास स्वबळावर लढण्यासाठी ४१ प्रभागांत इच्छुकांना तयारी करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. तरीदेखील पुण्यात भाजपसोबत युती होईल, अशी आमची अपेक्षा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादीचे मनोमिलनाचे संकेत

भाजपकडून सावध भूमिका घेतली जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसने स्वबळाची तयारी सुरू केली आहे. २०१७ मध्ये राष्ट्रवादीचे ४२ नगरसेवक निवडून आले होते. प्रभाग रचनेत ११ प्रभाग अनुकूल मिळावेत, अशी राष्ट्रवादीची मागणी होती. मात्र, भाजपकडून कोणताही प्रतिसाद न दिल्याने राष्ट्रवादी नाराज आहे. त्यातच युतीविषयीही अद्याप स्पष्ट संकेत मिळालेला नाही.

राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र यावेत, अशी मागणी होत आहे, तसेच महापालिका निवडणुकीत समविचारी पक्षांसोबत आघाडी करण्यास आम्ही तयार असल्याचे शहराध्यक्ष सुनील टिंगरे आणि सुभाष जगताप यांनी स्पष्ट केले. मात्र, अंतिम निर्णय अजित पवार घेतील, असेही त्यांनी नमूद केले.

# निकृष्ट डांबरीकरण भोवले; दोन अभियंते निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

वारजे परिसरातील रस्त्यावर झालेले निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण एका तरुणाने सोशल मीडियावर व्हायरल करताच महापालिका प्रशासनाने तातडीने कडक कारवाई करीत दोन अभियंत्यांना निलंबित केले आहे. तर संबंधित ठेकेदारावर एक लाख रुपयांचा दंड ठोठावून पुन्हा तक्रार आल्यास थेट काळ्या यादीत टाकण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



शहरात महापालिकेचे 'खड्डेमुक्त' अभियान जल्लोषात सुरू करण्यात आले होते. आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर रस्त्यांचा दर्जा सुधारेल, अशी नागरिकांची अपेक्षा होती. मात्र वारजेतील रस्त्यावर मातीवरच डांबर टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. दबाई न करता केलेल्या कामामुळे डांबराचे थर हातानेच निघत असल्याचे दृश्य सोशल मीडियावर व्हायरल झाले. हा प्रकार आयुक्तांच्या निदर्शनास येताच तातडीने चौकशीचे आदेश देण्यात आले. चौकशी अहवालात ठेकेदाराची गंभीर चूक स्पष्ट झाल्याने त्याला दंडाची नोटीस बजावण्यात आली. तर या कामावर देखरेख करणाऱ्या कनिष्ठ व उपअभियंत्यांचे स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शहरातील टिळक रस्ता, स्वारगेट, शुक्रवार पेठ, वाडिया रुग्णालय, कासेवाडी, राष्ट्रभूषण चौक, टिंबर मार्केट, रामोशी गेट आदी परिसरांतील रस्त्यांची अचानक पाहणी केली. रस्त्यांचे रिसर्फेसिंग करताना अधिक क्षेत्र व्यापल्यास दर्जेदार रस्ते तयार होतील, अशी स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केली. हिराबागमधील डांबर कोठीत पाहणीदरम्यान सेन्सर पेव्हर ब्लॉकचा मोठा साठा न वापरता पडून असल्याचे त्यांनी पाहिले. तसेच कोठीत भंगार साठवलेले असून परिसरात अस्वच्छता असल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला. यावेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पथ विभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर आणि अधीक्षक अभियंता अशित जाधव उपस्थित होते. वारजेतील प्रकारानंतर नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. शहरात खड्डेमुक्त अभियान जोमात सुरू असताना अशा निकृष्ट कामांमुळे महापालिकेची प्रतिमा धोक्यात येत असल्याची नाराजी नागरिकांत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन खऱ्या अर्थाने दर्जेदार कामे करण्यासाठी किती काटेकोर उपाययोजना करेल, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पोलीस आयुक्तांच्या आश्वासनानंतर पेट्रोल पंप चालकांचा बंदचा निर्णय मागे

**पुणे । प्रतिनिधी**

पेट्रोलपंपावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्याच्या निषेधार्थ पुण्यात सायंकाळी सात वाजल्यानंतर पेट्रोलपंप बंद ठेवणार असल्याचा इशारा ऑल इंडिया पेट्रोल ड्रीलर्स असोसिएशनने पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आश्वासन दिल्यानंतर मागे घेतला आहे. संबंधित पेट्रोल पंपांना संरक्षण देणार आणि मारहाण करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन पोलीस आयुक्तांनी असोसिएशनच्या प्रतिनिधींना दिले आहे.




पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे आदरणीय अध्यक्ष अमानुल्ला खान, राष्ट्रीय प्रवक्ते अली दारूवाला यांनी पोलीस आयुक्त अमितेशजी कुमार यांची बुधवारी भेट घेतली. त्यावेळी गुन्हेगारी वाढलेल्या आणि ज्या पेट्रोलपंपावर हा प्रकार घडला त्या पंपावर तात्काळ पोलीस मदत देण्याचे आश्वासन दिल्याचे दारूवाला यांनी सांगितले. त्यामुळेच सायंकाळी सात वाजल्यानंतर पेट्रोल पंप बंद ठेवण्याचा निर्णय रहीत केल्याचेही ते म्हणाले. काही दिवसांपासून पुण्यात पेट्रोल पंपावर कर्मचाऱ्यांसोबत मारामारी करण्याचे प्रकार वाढले आहेत. भैरोबानाला, पूलगेट आणि येरवडा येथील परिसरात पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण करण्यात आली आहे, या पार्श्वभूमीवर पोलीसांनी कारवाई करावी अशी मागणी असोसिएशन आणि पंपावरील कर्मचाऱ्यांनी पोलीस आयुक्तांकडे लेखी निवेदनाद्वारे दिली. त्यावर आयुक्तांनी उपरोक्त निर्णय घेतला आहे.

# ३२ गावांतील करवसुली थांबवा; नगरविकास विभागाचा महापालिकेला पुन्हा आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेत समाविष्ट ३२ गावांमधील शास्तीकर आकारणी तसेच कर वसुली करण्यास स्थगिती दिली आहे. या गावांत पालिके ग्रामपंचायतीच्या करापेक्षा दुप्पट दराने मिळकत कर आकारणी करावी असे आदेश शानाने दिले होते. याबाबत पुनर्विलोकन होईपर्यंत पालिकेने करवसुली थांबवावी असे आदेश नगरविकास विभागाने पत्राद्वारे पालिकेस बुधवारी पाठविले आहे.उपसचिव प्रियंका छापवाले यांनी हे पत्र पाठविले असून पत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५० (अ) अन्वये निर्देश दिले आहेत.

या निर्देशांच्या अनुषंगाने अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले असून पालिकेने तातडीने कार्यवाही करावी आणि कार्यवाहीचा सविस्तर अहवाल शासनाकडे तात्काळ सादर करावा, असे पत्रात नमूद केले आहे. शासनाकडून विधानसभा निवडणूकीपुर्वी अशाच प्रकारे आदेश काढले होते.त्यानंतर गेल्या वर्षभरात त्यावर काहीच कारवाई झालेली नाही. त्यानंतर आता पुन्हा महापालिका निवडणुकांच्या तोंडावर तेच आदेश काढले असून हे आदेश निवडणूक जुमला ठरण्याची चिन्हे आहेत.

शासन आदेश काढावा

या गावाना दुप्पट कर आकारणी शक्य नसल्याचे महापालिकेने या पूर्वीच शासनास कळविले आहे. या गावांसाठी मंगळवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतलेल्या बैठकीतही महापालिका आयुक्तांनी कर आकारणीबाबत शासन निर्णय होणे अपेक्षीत आहे. तसेच, नियमात बदल करणे आवश्यक असल्याची भूमिका मांडली होती. तसेच नगरविकास सचिवांच्या आदेशाच्या पत्रावर अशा प्रकारे कारवाई करता येणार नसल्याचेही सांगण्यात आले होते. नगरविकास उपसचिवांकडून कर वसुलीस स्थगिती असताना तसेच महापालिकेकडून कोणतीही वसुली होत नसतानाही पुन्हा एकदा स्थगितीचे आदेश काढले आहेत.

# चंद्रकांत पाटलांच्या उपस्थितीत २० महाविद्यालयांचा गौरव पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दिला होता मदतीचा हात

पुणे । प्रतिनिधी

सामाजिक कामे संवेदनशीलतेने केले पाहिजे,असे मत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उच्च शिक्षण संचालनालय आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे शिवाजीनगरमधील मॉडर्न कॉलेजतर्फे संकटातून संकल्पाकडे हा कार्यक्रम झाला. यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर,



उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. जोत्स्ना एकबोटे, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढे येण्याच्या आवाहनाला राज्यातील संस्था, विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रतिसाद देत मदत कार्य राबवले. यासाठी राज्यातील २० महाविद्यालयांची मोलाची मदत चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. याच महाविद्यालयांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शिक्षक भरती आणि संशोधन निधी उपलब्ध होईल का याचा विचार करण्याची गरज असल्याचे मत प्रा. डॉ. गजानन एकबोटे व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले. आभार डॉ. अर्चना बोऱ्हाडे यांनी मानले.